www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■ वर्ष - ०२ ■ अंक २०४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, २८ डिसेंबर २०२४ ■ रु. २/-

■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



■ स्थानक परिसरात लवकरच 'टायर किलर'
पान ३ वर....



■ रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळे पर्यटकांनी गजबजली
पान ६ वर....

# म्हाडाच्या बृहतसूचीतील घरांसाठी रहिवाशांचा तीव्र संघर्ष




● मुंबई, विशाल कारंडे :

**इमारत धोकादायक झाली की हक्काची घरे रिकामी करा, म्हाडा सांगेल त्या संक्रमण शिबिरात जा, म्हाडा म्हणेल तेव्हा या संक्रमण शिबिरातून त्या संक्रमण शिबिरात स्थलांतर करत राहा, अशी स्थिती म्हाडाकडून तात्पुरता आसरा घेतलेल्या हजारो कुटुंबांची आहे. या कुटुंबांसाठी बृहतसूची ही एकमेव आशा असली तरी मूळ जागी पुनर्विकास होण्याची आशा दाखवत म्हाडाचे अधिकारी या लोकांना बृहतसूचीवरील घरेही मिळू देत नाहीत.**

माझगाव म्हातारपाखाडी येथील म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारतीत तुकाराम नाडकर अनेक वर्षे वास्तव्यास होते. ती इमारत धोकादायक झाल्यानंतर १९८५ साली त्यांना चेंबूर येथील सुभाषनगर संक्रमण शिबिरात जागा देण्यात आली. गेली जवळपास ४० वर्षे ते आपल्या कुटुंबासह संक्रमण शिबिरात राहात आहेत. संक्रमण शिबिरात वर्षानुवर्षे राहणाऱ्या रहिवाशांना हक्काचे घर देण्यासाठी म्हाडाने बृहतसूची (मास्टरलिस्ट) सुरू केली. यात अर्ज करून सोडतीद्वारे घर मिळवण्याची संधी नाडकर यांच्याकडे होती. २०१४ साली ते या प्रक्रियेसाठी पात्र ठरले होते.

म्हातारपाखाडी येथील इमारतीचा पुनर्विकास होणार असल्याचे सांगून २०१६ साली नाडकर यांना बृहतसूचीसाठी अपात्र ठरवण्यात आले. पुनर्विकास करण्यासाठी काही वर्षांपूर्वी विकासकाला ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे; मात्र त्याने तेथे काम सुरू केलेले नाही. शिवाय पुनर्विकासाच्या नियमानुसार द्यावे लागणारे आगाऊ भाडेही विकासकाने दिलेले नाही. म्हाडा विकासकावर कारवाई करत नाही आणि बृहतसूचीमधून घरही देत नाही. त्यामुळे आज वयाची ८० वर्षे ओलांडल्यानंतरही नाडकर एकप्रकारे बेघरच आहेत. सचिन घाणेकर यांच्या वडिलांचेही घर म्हातारपाखाडीतील इमारतीत होते. १९८५ ते २०१७ या काळात घाणेकर कुटुंबीय सुभाषनगर संक्रमण शिबिरात राहात होते. या इमारतीचा पुनर्विकास करण्यात येणार असल्याचे सांगून त्यांना २०१८ साली मुलुंडच्या गवाणपाडा संक्रमण शिबिरात पाठवण्यात आले. पान २ वर

## डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर राजघाटाजवळ आज होणार अंत्यसंस्कार

नवी दिल्ली - भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे पार्थिव शनिवारी (२८ डिसेंबर) सकाळी ८ वाजता काँग्रेस मुख्यालयात आणले जाईल. सकाळी ८.३० वाजतापासून काँग्रेस मुख्यालयात कार्यकर्ते आणि नागरिकांना अंत्यदर्शन घेता येणार आहे. त्यानंतर ९.३० वाजता. काँग्रेस मुख्यालयातून डॉ. मनमोहन सिंग यांची अंत्ययात्रा सुरु होईल. राजघाटाजवळील सरकारी स्मशानभूमीत डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. काँग्रेसचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी ही माहिती दिली. मिळालेल्या माहितीनुसार, मनमोहन सिंग यांच्यावर उद्या अंत्यसंस्कार होणार आहेत. शुक्रवार (दि.२७) संध्याकाळपर्यंत त्यांच्या तीन मुली अमेरिकेतून भारतात आल्या. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना तीन मुली आहेत. माजी पंतप्रधानांच्या तीनही मुलींचे आपापल्या क्षेत्रात मोठे नाव आहे. त्यांची मोठी मुलगी उपिंदर सिंग ६५ वर्षांची आहे. त्यांना दोन मुले आहेत. तर दुसरी मुलगी दमन सिंग ६१ वर्षांची आहे.



## ◊ थोडक्यात ◊



### भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे निधन, सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

मुंबई : भारत सरकारने दु:ख व्यक्त करत भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाची घोषणा केली आहे. त्यांचे निधन २६ डिसेंबर २०२४ रोजी नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात झाले.

डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे भारत सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दुखवटा २६ डिसेंबर २०२४ पासून १ जानेवारी २०२५ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) पाळला जाईल. या काळात राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवला जाईल आणि कोणतेही शासकीय मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत.

डॉ. मनमोहन सिंग यांना शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात येणार आहे. तसेच, त्यांच्या अंतिम संस्काराच्या दिवशी देश-विदेशातील सर्व भारतीय दूतावासांमध्येही राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवण्यात येईल.

### मंत्री पंकजा मुंडे यांनी पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाचा कार्यभार स्वीकारला



मुंबई : पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे आज मंत्रालयातील त्यांच्या दालनात आगमन झाले. माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे नियोजित सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आल्याने अत्यंत साधेपणाने मंत्री श्रीमती मुंडे यांनी मंत्रालयातील त्यांच्या दालनात पदभार स्वीकारून कामकाजाची सुरुवात केली. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन केले. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. यावेळी मंत्री कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नंबर प्लेट लावण्याचे आवाहन

मुंबई : सर्वोच्च न्यायालयाने सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी अर्थात हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादीत केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्याचा निर्णय घेतला आहे. अशा वाहनांना ही नोंदणी क्रमांकाची पाटी असणे बंधनकारक असणार आहे. तसेच १ एप्रिल २०१९ नंतर खरेदी केलेल्या वाहनांवर उत्पादकामार्फत उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्यात आल्यामुळे अशा वाहनधारकांना पुन्हा ही नंबर प्लेट लावण्याची आवश्यकता नाही. नोंदणीकृत वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविणे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे.

# भूकंपाचे परिणाम जोखण्यासाठी राज्यातील ३० धरणांमध्ये विशिष्ट यंत्रणा

● नाशिक, सचिन कदम :



राज्यातील प्रमुख धरणांमध्ये भूकंपाच्या धक्क्यामुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी विशिष्ट स्वरुपाची यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रारंभी कोयना, जायकवाडी, गोसीखुर्द. उजनी अशा मोठ्या २५ ते ३० धरणांत ही उपकरणे बसविण्याचे नियोजन आहे.

जलसाठा, भूगर्भातील हालचाली आदींचा वेध घेण्यासाठी धरणात विविध प्रकारची उपकरणे कार्यरत असतात. मध्यंतरी धरण सुरक्षितता विभागाने प्रमुख धरणांमध्ये भूकंप मापनासाठी यंत्रणा उभारण्याची तयारी केली होती. तथापि, भूकंप मापनाचे काम भारतीय हवामान विभागाकडे आहे. या विभागाचे एक केंद्र महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या नाशिक मुख्यालयात आहे. धरण सुरक्षितता कायदा लागू झाल्यामुळे धरणांच्या आरोग्याकडे लक्ष देणे क्रमप्राप्त ठरले. त्यामुळे धरण सुरक्षितता विभागाने प्राधान्यक्रम बदलला. भूकंपमापनाऐवजी भूकंपाच्या धक्क्यांमुळे धरणावर होणाऱ्या परिणामांच्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले. त्याचा भविष्यातील धरणांच्या रचनेत उपयोग होईल. त्या अनुषंगाने भूकंपाच्या धक्क्यांचा धरणावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करण्यासाठी त्वरणआलेखी उपकरणे (स्ट्राँग्र मोशन एक्सेलेरोग्राफ) बसविण्याचे निश्चित झाले. या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याची माहिती जलविज्ञान आणि धरण सुरक्षितता विभागाचे मुख्य अभियंता सुदर्शन पगार यांनी दिली.

प्रत्येक धरणात तळाशी, मध्यभागी आणि वरील भागात याप्रकारे प्रत्येकी तीन उपकरणे बसविली जातील. त्यामार्फत संकलित होणाऱ्या माहितीद्वारे भुकंपाच्या धक्क्यांनी धरणाच्या संभाव्य नुकसानीचा अभ्यास करता येईल. पहिल्या टप्प्यात राज्यातील कोयना, उजनी, जायकवाडी, गोसीखुर्द, भंडारदरा, गिरणा, हतनूरसह २५ ते ३० प्रमुख धरणांवर ही उपकरणे बसविली जाणार आहेत.

# मंत्री रमले सत्कारात, मुख्यमंत्री व्यस्त कामकाजात



## १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या छाननीच्या कामास सुरुवात

● मुंबई, विशाल कारंडे :

मंत्रीपद मिळाल्यानंतर पदभार स्वीकारणे आणि मतदारसंघात सत्कार समारंभ व मिरवणुकांमध्ये अनेक मंत्री दंग असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र कामाला लागले आहेत. प्रत्येक खात्याने १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वीच दिले असून, या आराखड्याचा आढावा व छाननी करण्याचे काम त्यांनी सुरू केले आहे.

फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर लगेचच प्रत्येक खात्याला १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर दोन आठवड्यांनी मंत्रिमंडळ विस्तार झाला आणि नागपूर येथे हिवाळी अधिवेशन झाल्यावर खातेवाटप झाले. त्यामुळे अनेक मंत्र्यांनी मुंबईत येऊन मंत्रालयातील दालनात पदभार स्वीकारणे आणि खात्याची आढावा बैठक घेण्याचे काम सुरू झाले. पण बहुसंख्य मंत्र्यांच्या मंत्रालयातील दालनांचे नूतनीकरणाचे काम सुरू असल्याने फडणवीस यांच्यासह अनेक मंत्र्यांनी सह्याद्री अतिथीगृह येथूनच बैठका व कामकाज सुरू केले आहे.

मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होऊन सुमारे तीन आठवडे होत आल्याने त्यांनी मंत्र्यांची वाट न पाहता प्रत्येक खात्याच्या कृती आराखड्याचा आढावा घेण्याचे काम सुरू केले आहे. मंत्री हा त्या खात्याचा प्रमुख असतो. पान २ वर

## संतोष देशमुख हत्याकांड

# १९ दिवसांनंतरही मुख्य आरोपींना अटक करण्यात पोलिसांना अपयश

● बीड, दिगंबर जाधव :



राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून झालेल्या हत्याकांडातील मुख्य आरोपीला घटनेला १९ दिवस उलटूनही अटक झालेली नाही. पोलीस आणि तपास यंत्रणासमोर आव्हान उभे राहिले आहे. आता तपास सीआयडीकडे वर्ग केलेला आहे. यातील फरार आरोपींचा ठाव ठिकाणा शोधण्यासाठी पोलीस आणि तपास यंत्रणा रात्रंदिवस जंग जंग पछाडत आहेत.

दि. ९ डिसेंबर रोजी केज तालुक्यातील सरपंच संतोष देशमुख यांची केज-मांजरसुंबा महामार्गावरील डोणगाव फाटा जवळ असलेल्या टोल नाक्यावर अडवून त्यांच्या गाडीच्या काचा फोडून अपहरण केले होते. त्यानंतर काही वेळातच त्यांना अज्ञात ठिकाणी घेऊन जात अपहरणकर्त्यांनी त्यांचा निर्घृण खून केला. त्यानंतर त्यांचा मृतदेह दहीटना पाटीजवळ फेकून दिला होता.

या हत्याकांडातील आरोपी जयराम चाटे आणि महेश केदार या दोन आरोपींना तांबवा या गावातून ताब्यात घेतले आहे. पान २ वर

# सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत देशभरातून महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक

## मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत डिसेंबरमध्ये दररोज सरासरी ८४४ शेतकऱ्यांना लाभ

● मुंबई, यश सावंत :



शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स आणि कृषी पंप असा संपूर्ण संच देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' या योजनेच्या अंमलबजावणीला गती आली असून डिसेंबर महिन्यात दररोज सरासरी ८४४ पंप राज्यात बसविण्यात आले, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा दीर्घ काळाचा पेड पेंडिंगचा प्रश्न सोडविण्याचा निर्धार त्यांनी केला आहे.

राज्यामध्ये महावितरणच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात दि. २६ पर्यंत २१,९५१ सौर कृषी पंप बसविण्यात आले, अर्थात दररोज सरासरी ८४४ पंप बसविण्यात आले. ही आतापर्यंतची कोणत्याही महिन्यातील सर्वाधिक सरासरी आहे.

राज्यात २०१५ पासून २०२३ पर्यंत विविध योजनेत १,८०,००० सौर पंप बसविण्यात आले होते. तथापि, या वर्षी मार्च २०२४ पासून आतापर्यंत फक्त आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात १,५८,००० सौर पंप बसविण्यात आले आहेत. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषी पंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. पान २ वर

# चिमुकल्या बहिणींच्या अत्याचार अन् हत्येने पुणे हादरलं, शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे राजगुरूनगरमध्ये पोहचल्या

● पुणे, अभिजित येरल्लू :




पुण्याच्या राजगुरुनगरमध्ये शेजारीच वास्तव्यास असणाऱ्या परप्रांतीय ५४ वर्षीय नराधमाने चिमुकल्या मुलींवर अत्याचार करुन खून केल्याची घटना घडली आहे. या घटनेचा सर्वत्र निषेध नोंदवण्यात येत आहे. दरम्यान, शिवसेना नेत्या तथा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या राजगुरूनगरमध्ये पोहचल्या असून त्यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे.

राजगुरूनगरमध्ये एका हैवानाने चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून अमानुषपणे हत्या केली. या घटनेनं पुणे हादरल्यानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे थेट राजगुरूनगरमध्ये पोहचल्यात. नराधम आरोपी अजय दासच्या अटकेनंतर पोलीस तपासात आणखी काय-काय समोर आलंय, याची माहिती नीलम गोऱ्हे घेतायेत. त्यानंतर पीडित कुटुंबाची सांत्वनपर भेट त्यांनी घेतली आहे.


आता यापुढं परप्रांतीयांच्या नोंदी ठेवण्याची गरज आहे. सोबतच ते ज्या राज्यातून येतायेत तिथली त्यांची पार्श्वभूमी पाहणं आवश्यक आहे. त्यासोबतच स्थानिकांनी भाडेकरूंच्या नोंदी ठेवण्यासाठी आग्रह धरायला हवा. असं गोरेंनी नमूद केलं. चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी व्हायला हवी, यासाठी आम्ही ही पाठपुरावा करू. पान २ वर

### मुलींवर अत्याचार थांबवायचे असतील तर...., - नीलम गोऱ्हे

राजगुरूनगरमध्ये एका हैवानाने चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून अमानुषपणे हत्या केली. यानिमित्ताने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याची कबुली विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे दिली. नीलम गोऱ्हे यांनी राजगुरूनगरमध्ये जाऊन नराधम आरोपी अजय दासच्या अटकेनंतर पोलीस तपासात आणखी काय-काय समोर आलंय, याची माहिती गोऱ्हेनी घेतली. त्यानंतर पीडित कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतली. या कुटुंबाला आर्थिक मदत दिली जाईल, मात्र या मदतीमुळं त्या दोन्ही चिमुकल्या परत येणार नाहीत. त्यामुळं मुळतः ही विकृती ठेवण्याची गरज आहे. यासाठी सरकार कठोर पावले उचलेल, असा विश्वास गोऱ्हेनी व्यक्त केला.

# नवी मुंबईत सायबर लूटचा आकडा १ अब्ज ३७ कोटींहून अधिक

● नवी मुंबई, धनश्री सट्टा :



नवी मुंबईत जानेवारी ते नोव्हेंबर या केवळ ११ महिन्यात १ अब्ज ३७ कोटी ८० लाख ६२ हजार ३१७ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली आहे. तर ४० कोटी ४३ लाख ४४ हजार ४५६ एवढी रक्कम गोठविण्यात पोलिसांना यश आले. ११ महिन्यात ज्यांच्या विरोधात गुन्हे दाखल आहेत अशा ६२ जणांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. कमी गुंतवणुकीवर भरघोस नफा मिळवण्याचा मोह, आणि सायबर गुन्ह्याबाबत अज्ञान या मुख्य कारणांनी ही फसवणूक झाली असून तक्रार उशिरा देणे आणि तपास अत्यंत किचकट असल्याने गुन्हेगारांचे फावते आहे.

सट्टा बाजारात गुंतवणूक करा अल्पवधीत भरघोस परतावा मिळावा, आम्ही पाठवलेल्या यु ट्यूब लिंकला लाईक सबस्क्राईब करा घरबसल्या रिवॉर्ड मिळवा, केवळ पॉईंट द्या आणि लाखो रुपये कमवा अशा फसव्या जाहिरातींना बळी पडलेल्या लोकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केली जात आहे. पान २ वर

## संपादकीय

# बड्या रुपया, कारटा डॉलर

वर्तमानाचा विचार करताना देशाची संपत्ती, साधनसामग्री, उपभोग आणि व्यवहार यांची सुसंगत मांडणी अपरिहार्यच. त्यातून उरणारा प्रश्न एवढाच की, आपल्या घरची अर्थव्यवस्था ही चिंताकारक बनली आहे, हे पटते आहे काय? अगदी विपन्नावस्था नव्हे, पण ओढगस्त फार दूर नाही हे वर्तमानाचे सूचित नक्कीच. डॉलरपुढे दिवसेंदिवस ठुसका ठरत असलेला रुपया हेच सांगतो. दोन-अडीच महिन्यांत मोठ्या गतीने त्याने डॉलरमागे पंच्याऐंशीच्या भावनिक पातळीलाही भेदले. हे पाहता स्थिती आटोक्यात येण्यापलीकडे गेली इतके निश्चितच. तरीही चलाखपणात हार मानायची नाही असे काहींनी ठरविलेच आहे. त्यांचे म्हणणे रुपया पडतो असे नव्हे तर जगाच्या आर्थिक व्यवस्थेचे चलन असलेला डॉलर पुष्ट बनत चालल्याचा हा परिणाम आहे. शिवाय रुपया घसरला तर घसरला, त्यायोगे जगाच्या बाजारात आपल्या मालाला मोठी किंमत मिळविता येते. म्हणजेच निर्यातीतून आपले उत्पन्न वाढते. हे काही कमी नाही, असे राज्यशकट चालवणाऱ्यांनाही वाटते. त्यांचे हे वाटणे अपरिपक्व असल्याचे 'लोकसत्ता'ने याआधीही म्हटलेच आहे. आता तर त्यावर देशाचा दुसरा धोरण-ध्रुव असलेल्या रिझर्व्ह बँकेनेही शिक्कामोर्तब केले आहे. रिझर्व्ह बँकेकडून प्रसृत ताजी आकडेवारी आणि तिची उकल या संदर्भात क्रमप्राप्त ठरते. रिझर्व्ह बँक म्हणते की, रुपयाचे हलकेपण हे डॉलरच्या बदल्यात सुरू आहेच. पण त्यापेक्षा भीषण गोष्ट अशी की, भारताकडून व्यापार सुरू असलेल्या जगातील अन्य राष्ट्रांच्या चलनांच्या तुलनेत रुपयाचे मूल्यवर्धन सुरू आहे. एकुणात रुपयाची पटलावरील सार्वकालिक उतरंड आपल्या डोळ्यादेखत सुरू आहेच. हे अधिक भीतीदायी म्हणावे की डॉलरव्यतिरिक्त अन्य चलनांच्या तुलनेत त्याची सशक्तता भयंकर मानावी, हे पाहावे लागेल. ते नेमके सांगणारा निर्देशांक म्हणजे रुपयाचा 'वास्तविक प्रभावी विनिमय दर'. हा दर अर्थात 'रिअल इफेक्टिव्ह एक्स्चेंज रेट (रीअर)' हा द्विपक्षीय व्यापारात कोणाचे पारडे जड हे मापणारा एक सर्वमान्य निर्देशांक आहे. सर्वमान्य म्हणजे जगभरात मान्यता पावलेला असल्याने त्याला नाकारण्याची आपल्या धोरणकर्त्यांनाही संधी नाही, हे मुद्दाम स्पष्ट केले पाहिजे. हा निर्देशांक गेल्या वर्षी एप्रिलमध्ये शंभराखाली- म्हणजे ९९.०३ अंशावर होता. तेथून तो यंदाच्या नोव्हेंबरअखेर १०८.१४ अंशांचा उच्चांक गाठेपर्यंत चढला आहे. सरलेल्या ऑक्टोबरमधील १०७.२० या पातळीवरून अवघ्या महिनाभरात जवळपास एका अंशाची त्यात भर पडली आहे. या निर्देशांकाचा पारा खाली उतरतो तेव्हा भारताच्या निर्यातीला अधिक बरकत येते. परंतु सध्यासारखा पारा चढत जाणे हे भारताच्या द्विपक्षीय निर्यात व्यापाराला मारक ठरते. हे असे का घडते, ते उलगडून पाहूच. त्याआधी रुपयाचे पडणे निर्यातीसाठी फायदेशीर म्हणणाऱ्यांचे बुद्धिवैभव अगाधच आहे, हे कळू द्यावे. रुपयाचे हे एकीकडे झडणे आणि दुसरीकडे बळावणे असे विचित्र विचलन सध्या सुरू आहे. अमेरिकी चलन म्हणजेच डॉलरचे सबंध जगभरच्या चलनांबाबत बिघडलेले वर्तन हेच यामागील पक्के कारण, हे खरे. तेथे राष्ट्राध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुनरागमनाने डॉलरचे भलतेच फावले आहे. या सामर्थ्यातून त्या चलनाची ही उद्दाम दांडगाई सुरू आहे हेही खरेच. ट्रम्प आणि त्यांच्या संभाव्य धोरण धुडगुसाची अवघ्या जगाने धास्ती घेतली आहे. ट्रम्प यांनी जाहीरपणे म्हटल्याप्रमाणे अमेरिकेत दाखल होणाऱ्या आयात मालावरील सीमाशुल्क सरसकट वाढविल्यास केवळ चीनलाच नव्हे तर कुणासही ते जाचकच ठरेल. तसे झाले तर अमेरिकेतील आताशी काबूत येत असल्याचे दिसलेल्या चलनवाढीलाही ते फुंकर घालणारे ठरेल. हे लक्षात घेऊनच तेथील मध्यवर्ती बँकेने – 'फेड'ने – सुरू केलेले व्याजदर कपातीचे चक्र यापुढे थांबेल असे म्हटले नसले, तरी त्याची गती कमी होईल असे संकेत दिले आहेत. अर्थात कदम आस्ते आस्ते करत थांबणार. हे ताडूनच अमेरिकी रोख्यांच्या परतावा दराने मोठी उचल खाल्ली आहे. गुंतवणूकदारांना मायदेशात चांगला लाभ मिळत असेल तर भारतासारख्या उभरत्या राष्ट्रात तो गुंतवण्याची जोखीम ते घेणारच नाहीत. म्हणूनच परकीय गुंतवणूकदार संस्थांच्या गुंतलेल्या पैशाचे पाय भारतासह, अनेक उभरत्या बाजारपेठांतून वेगाने माघारी फिरत आहेत. भारताबाहेर तो पैसा डॉलररूपाने जात असल्याने, त्यांच्यासाठी डॉलर पुरवता पुरवता रुपयाची पुरेवाट सुरू आहे. हे असे चक्र सुरू असताना, रुपयाचे पडणे हे डॉलरने अन्य चलनांच्या तुलनेत कमावलेल्या सशक्ततेच्या मात्रेइतके नाही, असे ताजा 'रीअर निर्देशांका'चा पारा सुचवतो. दांडग्या डॉलरपुढे जगातील अन्य चलनांइतका रुपया शरण गेलेला नाही, असा याचा दुसऱ्या शब्दांत अर्थ सांगता येईल. प्राप्त स्थितीत ही फुशारकीची गोष्ट खचितच नाही. उलट अनेक नवे पेचप्रसंग यातून पुढे उभे राहतील. दीर्घावधीत रुपयाचे मूल्य सर्व चलनांच्या बाबतीत ढेपाळलेच आहे, हेही दुर्लक्षिता येणार नाही. सन २०२२ च्या सुरुवातीपासून डॉलरच्या तुलनेत रुपया ७४.३० वरून ८५.२० असा गडगडला आहे. म्हणजेच प्रत्येक डॉलर मूल्याच्या आयातीसाठी भारतीय आयातदाराला आता ८५.२० रुपये मोजावे लागतील. हेच प्रमाण या काळात युरोबाबत ८४.०४ वरून ८८.५६ पर्यंत, तर ब्रिटिश पौंडाबाबत १००.३० वरून १०६.७९ पर्यंत वाढले आहे. डॉलरबाबतीत दिसलेले अवमूल्यन हे पौंड, युरोच्या तुलनेत कमी आहे, ही समाधानाची गोष्ट नाही हेच ताजे आकडे सांगतात. याचा पहिला वाईट परिणाम गेल्या महिन्यातील भारताच्या आयात-निर्यातीच्या आकड्यांतून दिसून येतो. आयात-निर्यात या दोहोंतील तफावत अर्थात व्यापार तूट फुगून नोव्हेंबरमध्ये ३,७४८ कोटी डॉलरवर जाणे हे अधिकच गंभीर. ही तूट वाढली कारण त्या महिन्यात निर्यात घटली, तर आयात प्रचंड वाढली. यातील केवळ सोन्याची आयात ही महिनाभरात दुपटीने वाढून विक्रमी १,४८० कोटी डॉलरवर गेली. वजनाने महिन्याला सरासरी ६८ टनांच्या घरात असलेली सोने आयात नोव्हेंबरमध्ये थेट २०० टनांपुढे गेली. हाच सध्याच्या क्षणाला सर्वात मोठा धोका आहे. रुपयाचा वास्तविक प्रभावी विनिमय दर चढत गेला तर निर्यात महाग होऊन तिला पाचर बसेल. त्याउलट आयात स्वस्त बनेल. ज्यायोगे सोन्यासारख्या खरे तर उपद्रवी चीजवस्तूंची मागणी बोकाळत जाईल. रुपयाचे मूल्यच नव्हे, तर व्यापारतोलात बिघाडासाठी हा मोठा हातभारच. धष्टपुष्ट डॉलर हे तर एक जागतिक संकटच, त्याला आपण तरी काय करणार? हीच यावर प्रतिक्रिया आणि हताश निष्क्रियता हेच उत्तर असावे काय? सरकार, रिझर्व्ह बँकेला करता येण्यासारखा उपाय काहीच नाही काय? भारतातील उत्पादकतेला चालना मिळेल, ते जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक ठरेल, हे शासनकर्त्यांच्या हाती निश्चितच आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अशा शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची सन १९८२-८३ पासून राबविण्यात येत असलेली "अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना)" बदललेल्या परिस्थितीत शेतकऱ्यांची आवश्यकता विचारात घेता ही योजना सुधारित करुन "डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना" या नावाने दि. ५ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत आर्थिक निकषांमध्ये सुधारणा व नवीन घटक समाविष्ट करण्याबाबत दि. १ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार शासनाने मान्यता दिली आहे.

या योजनेमध्ये सन २०२४-२५ या वर्षात खालील घटकांसाठी त्यापुढे नमूद रकमेच्या उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

**१) नवीन सिंचन विहीर:-** उच्चतम अनुदान मर्यादा: रु. ४ लाख

**२) जुनी विहीर दुरुस्ती:-** उच्चतम अनुदान मर्यादा: रु. १ लाख

**3) शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण:-**

उच्चतम अनुदान मर्यादा: राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याच्या आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के किंवा रु. २ लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.

**४) इनवेल बोअरिंग:-** उच्चतम अनुदान मर्यादा: रु. ४० हजार

**५) वीज जोडणी आकार:-**

उच्चतम अनुदान मर्यादा: रु. २० हजार किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.

**६) पंपसंच (डिझेल/विद्युत) (डिझेल इंजिन-नवीन बाब):-**

उच्चतम अनुदान मर्यादा: १० अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचाकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९० टक्के किंवा रु.४० हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.

**७) सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंप संच ऐवजी):-**

उच्चतम अनुदान मर्यादा: प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९० टक्के किंवा रु.५० हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.

**८) एचडीपीई / पीव्हीसी पाईप (नवीन बाब):-**

उच्चतम अनुदान मर्यादा: अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके या योजनेंतर्गत प्रति मीटरकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १०० टक्के किंवा रु.५० हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.

**९) सूक्ष्म सिंचन संच:-**

**९.१) तुषार सिंचन संच पूरक अनुदान:-**

**उच्चतम अनुदान मर्यादा:** प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत १) अल्प/अत्यल्प भूधारकांसाठी ५५ टक्के + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५ टक्के + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून १० टक्के तसेच २) बहू भूधारकांसाठी ४५ टक्के मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३० टक्के + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून १५ टक्के किंवा रु.४७ हजार या पैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादेत)

**९.२) ठिबक सिंचन संच पूरक अनुदान:-**

**उच्चतम अनुदान मर्यादा :** प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत १) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५ टक्के + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५ टक्के + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून १० टक्के तसेच २) बहू भूधारकांसाठी ४५ टक्के मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३० टक्के + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून १५ टक्के किंवा रु.९७ हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादेत)

**१०) यंत्रसामुग्री (बैलचलित / ट्रॅक्टर चलित अवजारे-नवीन बाब):-**

**उच्चतम अनुदान मर्यादा:** रु.५० हजार

**११) परसबाग (नवीन बाब):-**

**उच्चतम अनुदान मर्यादा:** रु.५ हजार

या योजनेंतर्गत ११ बाबी अंतर्भूत असून लाभ पॅकेज स्वरुपात खालीलप्रमाणे दिला जातो.

**नवीन विहीर पॅकेज:**

नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास नवीन विहीर, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच / डिझेल इंजिन, सोलर पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी). एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. ६ लाख ४२ हजार / रु. ६ लाख ९२ हजार एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (विहीर रु.४ लाख + इनवेल बोअरिंग रु.४० हजार + वीज जोडणी आकार - रु.२० हजार + विद्युत पंप संच/डिझेल इंजिन रु.४० हजार किंवा सोलर पंप (वीज जोडणी व पंप संच ऐवजी) रु.५० हजार + एचडीपीई/पीव्हीसी पाईप रु.५० हजार + तुषार सिंचन संच रु.४७ हजार किंवा ठिबक सिंचन संच रु. रु.९७ हजार + यंत्रसामुग्री रु.५० हजार + परसबाग रु.५ हजार रु.६ लाख ४२ हजार /रु.६ लाख ९२ हजार)

**जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज:**

जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंप संच / डिझेल इंजिन, सोलर पंप (वीज जोडणी व पंप संच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु.३ लाख ४२ हजार/रु.३ लाख ९२ हजार एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (जुनी विहीर दुरुस्ती - रु.१ लाख + इनवेल बोअरिंग रु.४० हजार + वीज जोडणी आकार - रु.२० हजार + विद्युत पंप संच/डिझेल इंजिन रु.४० हजार किंवा सोलर पंप (वीज जोडणी व पंप संच ऐवजी) रु.५० हजार + एचडीपीई/पीव्हीसी पाईप. रु.५० हजार + तुषार सिंचन संच रु.४७ हजार किंवा ठिबक सिंचन संच रु.९७ हजार + यंत्रसामुग्री रु.५० हजार + परसबाग रु.५ हजार रु.३ लाख ४२ हजार /रु.३ लाख ९२ हजार)

**शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज :**

शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, विद्युत पंप संच / डिझेल इंजिन, सोलर पंप (वीज जोडणी व पंप संच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री व परसबाग या घटकांसह एकूण रु. ४ लाख ०२ हजार /रु.४ लाख ५२ हजार एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

(शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण रु.२ लाख + वीज जोडणी आकार रु. २० हजार + विद्युत पंप संच / डिझेल इंजिन- रु.४० हजार किंवा सोलार पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी रु.५० हजार + एचडीपीई/पीव्हीसी पाईप रु.५० हजार + तुषार सिंचन संच रु.४७ हजार किंवा ठिबक सिंचन संच रु.९७ हजार + यंत्रसामुग्री रु.५० हजार + परसबाग रु.५ हजार = रु.४ लाख ०२ हजार/ रु.४ लाख ५२ हजार)

**लाभार्थी पात्रतेचे निकष:**

* लाभार्थी अनुसूचित जाती/ नवबौध्द प्रवर्गातील शेतकरी असणे बंधनकारक राहील.

* शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

* शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८ अ उतारा असणे आवश्यक आहे. (नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्राबाहेरील)

* लाभार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते असणे व ते बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

* दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य राहील.

* या योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु. १ लाख ५० हजार /- वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात येत आहे. लाभार्थी शेतकऱ्याकडे किमान ०.४० हेक्टर व कमाल ६.०० हेक्टर एवढी शेत जमीन असणे आवश्यक असेल मात्र, लाभार्थ्याची जमीन दुर्गम भागात व विखंडीत असल्याने ०.४० हेक्टर पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान ०.४० हेक्टर इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. त्याचप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ६.० हेक्टर धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही.

* एकदा संबंधित योजनेचा पूर्ण लाभ घेतल्यास पुढील पाच वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटुंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही. नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यास २० वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ अनुज्ञेय राहील.

* अशाच स्वरुपाच्या कृषीविषयक विकास योजनेकरिता विशेष घटक योजनेतून तसेच केंद्र शासनाच्या SCA व घटनेच्या कलम २७५(A) अंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनेतून लाभ दिला असल्यास योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

* या योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर त्याबाबतची नोंद घेण्यात येईल.

या योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलचे mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login या संकेतस्थळावर शेतकऱ्यांचे अर्ज मागविण्यात येत असून अधिक माहितीसाठी पंचायत समिती येथील कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन ठाणे जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर यांनी केले आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

## पान १ वरून...

### चिमुकल्या बहिणींच्या अत्याचार अन् हत्येने...

असं म्हणतानाचं फास्टट्रॅक मध्ये चालणारे खटले पुढे ट्रॅकवर किती फास्ट चालतात, हे पाहणं आणि प्रलंबित प्रकरणं निकाली लावण्यासाठी न्यायालय दोन शिफ्टमध्ये करावीत, अशी मागणी करताना न्यायव्यवस्था सुबक करण्यावर सरकारने भर द्यावा. असं ही गोऱ्हेनी नमूद केलं.

**पोलिसांकडे प्रत्येकाची माहिती कशी येणार?- शिवाजी आढळराव पाटील**

राजगुरूनगरमध्ये घडलेली घटना ही खळबळजनक आणि संताप आणणारी घटना आहे. असा विकृतपणा आपल्या उत्तर पुण्यात फारसे घडलेले नाहीत. चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून हत्या करणे ही अशोभनीय गोष्ट आहे. औद्योगिक वसाहतींमध्ये रोजगारासाठी येणाऱ्या कामगारांची माहिती ही घर मालकांनी देण्याची गरज आहे. यासाठी जागरूक राहायला हवं, तेंव्हा अशा घटना आपल्याला टाळता येतील, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे नेते शिवाजी आढळरावांनी दिली आहे.

सरकार याबाबत कठोर पावलं उचलत आहे. या पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणार. आर्थिक मदतीसाठी प्रयत्नशील राहीन. लोकसंख्या वाढलेली आहे. पोलिसांकडे प्रत्येकाची माहिती कशी येणार? प्रत्येक घरात कोण राहत आहे, हे पोलीस घरा-घरात जाऊन चौकशी कशी करेल? हे शक्य आहे का? त्यामुळं नागरिकांनी सहकार्याची भूमिका ठेवायला हवी. असेही ते म्हणाले.

दुसरीकडे, राजगुरूनगरमध्ये सकाळ पासून काही व्यापाऱ्यांनी स्वतःहुन दुकान बंद ठेवली आहेत. चिमुरड्या बहिणींवर अत्याचार करून हत्या करण्यात आल्याचे काही प्रमाणात असे पडसाद उमटत आहेत. आरोपीला तातडीनं फाशी द्यावी अशी मागणी केली जातीये. या मागणीला पाठिंबा देण्यासाठी अनेक व्यापारी दुकानं बंद ठेवत आहेत. इतरांनी ही या आंदोलनात सहभागी होण्यासाठी विविध संघटना आवाहन करत आहेत.

### म्हाडाच्या बृहतसूचीतील घरांसाठी...

त्यांना आजही म्हातारपाखाडी येथील घराची प्रतीक्षा आहे. दादासाहेब फाळके पुरस्कारप्राप्त नृत्य दिग्दर्शक नरेंद्र पंडित यांना १९८२ साली कुंभारवाडा येथील घर म्हाडाच्या नोटिशीमुळे सोडावे लागले. त्यांना घाटकोपर येथील संक्रमण शिबिरात पाठवले जाणार होते; मात्र तेथील इमारतीची अवस्था चांगली नसल्याने त्यांनी गोरेगाव येथे घर देण्याची विनंती केली. बराच पाठपुरावा केल्यानंतर त्यांना ओशिवरा संक्रमण शिबिरात पाठवण्यात आले.

अपुरा पाणी पुरवठा, चोरीमारी असा सगळा मनःस्ताप भोगत काही वर्षे घालवली खरी पण १९९२ सालच्या दंगलीनंतर तिथे थांबणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी गोरेगावच्या सिद्धार्थनगर संक्रमण शिबिरात बदली करून घेतली. दारुची दुकाने, जुगाराचे अड्डे, दलालांची मनमानी या सगळ्याला कंटाळत त्यांनी एकेक दिवस पुढे ढकलला. २०१३ साली म्हाडाने त्यांची रवानगी बोरिवलीला गोराई रोड येथील संक्रमण शिबिरात केली. येथेही त्यांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.पंडित यांनी बृहतसूचीसाठी अर्ज केला होता. सर्व कागदपत्रे म्हाडामध्ये जमा केली होती; मात्र म्हाडाच्या अंतर्गत भोंगळ कारभारामुळे ती कागदपत्रे संबंधित विभागाकडे जमाच झाली नाहीत व त्यांची बृहतसूचीवरील घराची संधी हुकली.

### सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत...

राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्यात साडेदहा लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. त्यामुळे कृषी पंपासाठी पैसे भरून वीज कनेक्शनची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सुटणार आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे.

सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीज पुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

### नवी मुंबईत सायबर लूटचा आकडा १ अब्ज...

तसेच केंद्रीय अन्वेषण किंवा सीआयडी मधून बोलत असल्याची थाप मारत डिजिटल अटक, तुमच्या खात्यातून अतिरेक्यांना पैसे गेले आहेत अशी धमकी देत पैसे घेतले जातात. तसेच ऑनलाइन कॅमेरा चॅटिंग मध्ये अश्लील बोलून बीभत्स चाळे करण्यास भाग पाडणे आणि त्याची रेकॉर्डिंग करून पैशांची मागणी करणे असेही प्रकार घडले आहेत. यावर्षीची आकडेवारी चक्रावणारी असून ऑनलाइन फ्रॉडचे ३५२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात ३७ गुन्हे उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. जानेवारी ते नोव्हेंबर या केवळ ११ महिन्यात १ अब्ज ३७ कोटी ८० लाख ६२ हजार ३१७ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली आहे.

गुन्हा नोंद होताच ज्या बँकेत तक्रारदाराने रक्कम वर्ग केली आहे. त्या बँकेशी संपर्क साधून तात्काळ संबंधित खाते गोठवण्यात आल्याने ४० लाख ४३ हजार ४४ हजार ४५६ रुपये वाचले आहेत. मात्र ही रक्कम मिळवणे ही न्यायालयीन प्रक्रिया आहे. समाज माध्यमातून बदनामी करणे, अश्लील फोटो टाकणे अशा ४२ तक्रारी आल्या असून त्यात २५ गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले आहे.

### मंत्री रमले सत्कारात, मुख्यमंत्री व्यस्त...

पहिल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात कोणत्या योजना व कार्यक्रमांना प्राधान्य द्यावे, कोणते निर्णय घेतले जावेत आदी बाबींवर मंत्र्यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. मात्र अनेक मंत्री मतदारसंघात सत्कार समारंभ, मिरवणुका व अन्य बाबींमध्ये व्यग्र आहेत. त्यामुळे फडणवीस यांनी प्रत्येक खात्याच्या सचिवांना पाचारण करून कृती आराखड्याच्या बैठका घेण्यास सुरुवात केली आहे.

**इतर मंत्र्यांचे दुर्लक्ष?**

फडणवीस यांनी आतापर्यंत सहा खात्यांच्या आढावा बैठका घेतल्या असून कृषी, उच्च व तंत्रशिक्षण, वन खात्याची बैठक गुरुवारी घेतली. मात्र त्यास संबंधित खात्यांचे मंत्री उपस्थित नव्हते, असे उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी सांगितले. या खात्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी कृती आराखड्याचे सादरीकरण फडणवीस यांच्यापुढे केले. त्यामुळे सध्या मुख्यमंत्री वेगाने बैठका व निर्णय घेत असून पहिल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीकडे मंत्र्यांचे मात्र फारसे लक्ष नसल्याचे चित्र आहे.

### १९ दिवसांनंतरही मुख्य आरोपींना अटक...

तर प्रतीक घुले याला स्थानिक गुन्हे शाखेने पुणे जिल्ह्यातून ताब्यात घेतले. तसेच आणखी एक आरोपी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा तालुका अध्यक्ष विष्णू चाटे याला बीड येथे महामार्गावर पाठलाग करून ताब्यात घेतले आहे. मात्र, मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे हे तिघे फरार आहेत.

तसेच या घटनेचा मास्टर माईंड म्हणून मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड यांचे नाव चर्चेत आले आहे. ज्या खंडणी प्रकरणाचा संबंध या हत्याकांडाशी जोडला जातोय; त्यामध्ये वाल्मीक कराड यांचेही नाव आहे. संतोष देशमुख यांच्या सर्व मारेकऱ्यांना अटक करून त्यांच्या मास्टर माईंडला अटक करून देशमुख यांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. या मागणीसाठी बीड येथे शनिवारी (दि. २८) भव्य आक्रोश मोर्चा निघणार आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# स्थानक परिसरात लवकरच ‘टायर किलर’



**ठाणे (रोहित जैसवाल) :** एक दिशा मार्गिका असतानाही वाहतुक नियमांचे उल्लंघन करून वाहन चालक विरुद्ध दिशेने वाहतुक करत असतात. अशा वाहन चालकांना वचक बसावा यासाठी ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील गावदेवी भागात महत्त्वाच्या ठिकाणी ‘टायर किलर’चा प्रयोग केला जाणार आहे. ठाणे महापालिकेच्या माध्यमातून येत्या पंधरवड्यात हे टायर किलर बसविले जाणार असून विरुद्ध दिशेने वाहतुक केल्यास वाहनाच्या चाकाचे नुकसान होईल. त्यामुळे चाकाचे नुकसान टाळण्यासाठी चालक स्वत:हून विरुद्ध दिशेने वाहने चालविणार नाही असे पोलिसांनी सांगितले. हा प्रयोग यशस्वी झाल्यास ठाणे शहरातील इतर भागातही टायर किलर बसविले जाणार आहे.

ठाणे रेल्वे स्थानक परिसरात हजारो वाहनांची वाहतुक होत असते. यामध्ये रिक्षा आणि दुचाकी वाहनांचे प्रमाण अधिक असते. स्थानक परिसरातील वाहतुक सुरळीत राहावी यासाठी काही भागात एक दिशा मार्गिका वाहतुक पोलिसांनी केल्या आहेत. असे असले तरी या मार्गिकांवर वाहतुक पोलीस नसल्यास काही वाहन चालक विशेषत: रिक्षा चालक विरुद्ध दिशेने वाहने चालवून या मार्गिकांमध्ये प्रवेश करत असतात. त्यामुळे वाहतुक अडथळा होऊन कोंडी होत असते. विरुद्ध दिशेने वाहने चालविल्यास गंभीर अपघाताची शक्यता निर्माण होते.

शहरातील वाहतुक व्यवस्थेविषयी सप्टेंबर महिन्यात ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी एक बैठक घेतली होती. रस्त्यावर विरुद्ध दिशेने वाहने चालविण्याच्या प्रकारांमुळे होणारे अपघात, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ठाण्यात प्रायोगिक तत्त्वावर ‘टायर किलर’ बसवण्याचा निर्णय त्यांनी या बैठकीत घेतला होता. त्यानुसार ठाणे महापालिका आणि वाहतुक पोलिसांनी काही क्षेत्र निश्चित करण्यास सुरूवात केली होती. त्यानुसार, ठाणे स्थानक परिसरातील शिवाजी महाराज पथ येथून गावदेवी मंदिराच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या मार्गावर आणि गावदेवी मैदानालगतच्या एक दिशा मार्गिका निश्चित केल्या आहेत.त्यानुसार, येत्या काही दिवसांत हे टायर किलर या भागात लागण्याची शक्यता आहे. टायर किलर रस्त्यावर लागल्यास विरुद्ध दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांवर वचक बसण्याची शक्यता आहे. त्यानुसार, ठाणे स्थानक परिसरातील सुभाष पथ भाग, गावदेवी मंदीर परिसर आणि बी-केबीन परिसर निश्चित केले आहेत. – हे तीन लोकेशन दिले आहेत. त्याऐवजी – त्यानुसार, ठाणे स्थानक परिसरातील शिवाजी महाराज पथ येथून गावदेवी मंदिराच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या मार्गावर आणि गावदेवी मैदाना लगतच्या एक दिशा मार्गिका निश्चित केल्या आहेत.

■ ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील प्रयोगानंतर शहरातील इतर एकदिशा मार्गिकांवरही हे टायर किलर बसविले जाणार आहे. हे टायर किलर बसविण्यापूर्वी त्याची सविस्तर माहिती त्या भागात दिली जाईल. टायर किलर असल्याची माहिती देणारे फलक १०० ते २०० मीटर आधीपासून लावण्यात येत आहे. या भागात रात्रीच्या वेळेस पुरेसा प्रकाश असल्याची खात्री केली जाईल. तसेच सीसीटीव्ही कॅमेरा क्षेत्रात तो भाग येत असल्याचे निश्चित केल्यानंतरच हे टायर किलर बसवले. टायर किलर हे गतीरोधकाप्रमाणे असतात. यावर लोखंडी काटेरी भाग असतो. वाहन योग्य मार्गाने आल्यास हे काटे खाली जातात. पण विरुद्ध दिशेने वाहन आल्यास चाकाचे लोखंडी काटेरी भागामुळे नुकसान होऊ शकते.

# शहापूर तालुक्यात शिवजल सुराज्य अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ



**ठाणे (यश सावंत)** - ठाणे ग्रामीण भागातील पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत “शिवजल सुराज्य अभियान” राबविण्यात येत असून या अभियानाचे शुभारंभ आज दि. २६ डिसेंबर, २०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते शहापूर तालुक्यातील आटगांव येथे करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आटगांव केंद्र साखरोली येथे पाऊस पाणी संकलन (रेन वॉटर हार्वेस्टिंग) कामाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते झाले. सीसीटी, डीप सीसीटी, पाऊस पाणी संकलन (रेन वॉटर हार्वेस्टिंग), वनराई बंधारे, ग्रामपंचायत अंतर्गत खाजगी विधंन विहीर पाहणी करून लोकसहभागातून रेन वॉटर हार्वेस्टिंग कामे करण्यात यावी तसेच गाव शिवार फेरी करून गावातील भूजल पातळी वाढ होऊन गावात पिण्याचे मुबलक पाणी मिळण्यासाठी वर्षभरात नियोजन करावे, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यावेळी दिले. यावेळी लघुपाट बंधारे विभागाचे विभाग प्रमुख दिलीप जोकार तसेच ग्रामस्थ, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आटगांव शाळेचे शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुरबाड व शहापूर तालुक्यातील टँकर ग्रस्त गावात ८५ तर इतर सर्व तालुक्यात १ हजार ५१५ वनराई बंधारे बांधण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेतले असून आज, शहापूर तालुक्यात ११० वनराई बंधारे, जल तारा ०७, भातखाचर १३, बांधबधीस्ती ०७ काम करण्यात आले आहे. कल्याण तालुक्यात ४७ वनराई बंधारे, भिंवडी तालुक्यात २१ वनराई बंधारे, मुरबाड तालुक्यात १४ वनराई बंधारे, अंबरनाथ तालुक्यात ११ वनराई बंधारे असे एकूण २०३ वनराई बंधारे तयार करण्यात आले.

गाव परिसरात पाण्याची साठवणूक करण्याच्या दृष्टिकोनातून; तसेच भूजल पातळी वाढण्यास मदत होण्यासाठी ओढ्यातील वाया जाणारे पाणी अडवून वनराई पद्धतीचा बंधारा बांधण्यात आले आहे. सिमेंटच्या किंवा अन्य मोकळया गोण्यांमध्ये वाळू भरून बंधारा बांधला असून बहुतेक शेतकऱ्यांच्या शेतालगतच्या परिसरातून ओढा, नाला वाहत असल्याने पावसाळा संपल्यावर पाण्याचा प्रवाह कमी झाल्यावर आढ्या, नाल्यावर वनराई बंधारे बांधणे शेतकऱ्यांना वरदान आहे. जानेवारी अखेर पर्यंत वनराई बंधारे कामे पुर्ण करण्यासाठी लोक सहभाग, सामाजिक संघटना, शासकीय अधिकारी, कर्मचारी संघटना, जिल्ह्यात काम करणाऱ्या अशासकीय संस्था (NGO), ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन पाणी प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा असे, आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.



# शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रोजेक्ट दिशा अंतर्गत जिल्हास्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन

**ठाणे (विशाल पाटील)** - मुलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत मार्फत प्रोजेक्ट दिशा व्ही स्कूल पोर्टल द्वारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावण्यासाठी कामकाज करण्यात येत आहे. यासाठी शिक्षण विभाग प्राथमिक जि प ठाणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ठाणे यांच्या वतीने प्रोजेक्ट दिशा अंतर्गत जिल्हास्तरीय शिक्षण परिषद दि. २६ डिसेंबर, २०२४ रोजी बी. जे. हायस्कूल, ठाणे येथे आयोजित करण्यात आली होती. शिक्षण परिषदेत जिल्ह्यातील ३३ अधिकारी, कर्मचारी व शिक्षक यांना दिशा प्रोजेक्ट तर्फे उत्कृष्ट कामकाज केल्याबाबत प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

'प्रोजेक्ट दिशा' या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्यानुसार विकास करण्यासाठी एआय, गेमिंग तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षकांनी विविध कृती साहित्याचा वापर करावा. आपल्या विद्यार्थ्यांचे कौशल्य लक्षात घेऊन त्यांच्या क्षमतेनुसार विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थी स्वयंप्रेरणेने कसे शिकतील यासाठी प्रयत्न करावे. आणि मागील पाच महिन्याचा आराखडा पाहता विद्यार्थ्यांची प्रगती दिसून येत असली तरी गोष्ट स्तरापर्यंत विद्यार्थ्यांला जाण्यासाठी मदत करावी, ज्या प्राथमिक शाळा व शिक्षकांनीतसेच पर्यवेक्षिय यंत्रनेने उत्तमप्रकारे कामकाज केले आहे आज त्याच कौतुक करताना आंनद होत आहे,तरी इतर सर्व शिक्षकांनी पुढाकार घेऊन कामकाज करावे, असे मार्गदर्शन शिक्षण परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी उपस्थित सर्व शिक्षकव पर्यवेक्षिय यंत्रणा यांना केले.

# डोंबिवलीत आजदे पाड्यातील गळक्या जलवाहिनीमुळे रस्त्यावर चिखल
## नागरिक त्रस्त, शाळकरी विद्यार्थ्यांचे हाल

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** येथील एमआयडीसीतील आजदे पाडा भागात बालाजी मंदिर परिसरातील एका रस्त्यावरील जलवाहिनी काही महिन्यांपासून फुटली आहे. या जलवाहिनीतील पाणी सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यावरून वाहून जाते. या रस्त्यावरील सततची वर्दळ आणि रस्ता सतत जलमय राहत असल्याने या रस्त्यावरील चिखलामुळे स्थानिक रहिवासी त्रस्त आहेत. पालक, विद्यार्थ्यांचे या रस्त्यावर सर्वाधिक हाल होत आहेत.

दुचाकी स्वार या जलमय रस्त्यावरून घसरण्याचे प्रमाण अधिक आहे. विद्यार्थी, पालकांची या रस्त्यावरून वर्दळ असते. लहान मुलांना शाळेत घेऊन जाताना, घरी नेताना पालकांना कसरत करावी लागते. पालिकेचा जलवाहिनीवरील पाणी पुरवठा सुरू झाला की या फुटलेल्या जलवाहिनीतून अधिक प्रमाणात पाणी रस्त्यावर येते, अशा तक्रारी रहिवाशांनी केल्या.



आजदे पाड्यातील बालाजी मंदिर रस्त्याच्या विरुध्द दिशेकडील रस्त्यावर हा प्रकार सुरू आहे. या चिखलमय रस्त्यामुळे नागरिकांना अन्य रस्त्याने जाण्याचा पर्याय निवडावा लागतो. या रस्त्यावरून वाहने जात असताना अंगावर पाणी उडते. त्यामुळे वादाचे प्रसंग निर्माण होत आहेत. या गळक्या जलवाहिनीविषयी पालिकेकडे तक्रारी केल्या आहेत. त्याची दखल घेतली जात नाही, अशा तक्रारी रहिवाशांनी केल्या.

या रस्त्याच्याकडेला चाळी आहेत. पाण्याचा प्रवाह वाढला की रस्त्यावरील पाणी चाळीच्या दिशेने जाते. त्यामुळे चाळींसमोर सतत ओलावा राहतो. या सततच्या ओलाव्याला कंटाळून येथील रहिवासी अन्य भागात राहण्यास गेल्याचे समजते. आजदे पाड्यातील रस्त्यावरून पाणी वाहत असताना त्याच रस्त्यावर दुतर्फा मोटारी, दुचाकी वाहने उभी करून ठेवलेली असतात. या भागात पदपथ नाहीत. या भागात सुरू असलेल्या इमारत बांधकामांचे साहित्य रस्त्यावर पडलेले असते. त्यामुळे चालायचे कोठून असा प्रश्न नागरिकांना पडत आहे.

पालिकेने या गळक्या वाहिनीची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. एमआयडीसीच्या हद्दीत हा भाग येतो. एमआयडीसी अधिकाऱ्यांनी याप्रकरणात लक्ष घालण्याची नागरिकांची मागणी आहे. पालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, शहराच्या विविध भागातील गळक्या जलवाहिन्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. या जलवाहिन्या दुरूस्त करण्यासाठी शहराचा पाणी पुरवठा बंद करावा लागतो. त्यानंतर हे काम करावे लागते. यापूर्वी अशाप्रकारे पाणी पुरवठा बंद ठेऊन गळक्या जलवाहिन्या दुरुस्त करण्यात आल्या.

# मराठी कुटुंबाला मारहाण प्रकरणी अखिलेश शुक्लासह इतर ५ आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ



**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याणात मराठी कुटुंबावर हल्ला करणारा मुख्य आरोपी अखिलेश शुक्ला, पत्नी गीता शुक्ला यांच्यासह सुमित जाधव, दर्शन बोराडे, पार्थ जाधव आणि विवेक जाधव या आरोपींची आज ६ दिवसांची पोलीस कोठडी संपल्याने कल्याण न्यायालयात त्यांना हजर केले असता न्यायालयाने त्यांच्या पोलीस कोठडीत वाढ करत आणखी दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. कल्याण पश्चिमेतील योगिधाम परिसरातील अजमेरा हाईट्स या इमारतीत धूप लावण्यावरून झालेल्या वादातून अखिलेश शुक्ला या परप्रांतीय व्यक्तीने अभिजित देशमुख या मराठी कुटुंबावर गुंडांच्या मार्फत प्राणघातक हल्ला केला होता. या प्रकरणी विधानसभेत गदारोळ झाल्या नंतर सुरवातीला दोन सुमित जाधव आणि दर्शन बोराडे या दोन आरोपींना अटक केली होती. त्यानंतर मुख्य आरोपी अखिलेश शुक्ला याला कल्याणच्या खडकपाडा पोलिसांनी ताब्यात घेतले होते. तर या प्रकरणी शुक्ला याची पत्नी गीता शुक्ला सह पार्थ जाधव आणि विवेक जाधव यांना देखील अटक करण्यात आली होती. या सहा जणांना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. त्यानंतर ही पोलीस कोठडी संपल्याने आज न्यायालयात हजर केले असता अधिक तपास करण्यासाठी दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यात फिर्यादीला धमकविण्यासाठी वापरलेले अग्निशस्त्र अद्याप पोलिसांच्या हाती लागले नसल्याने, याबाबत तपास करण्यासाठी वेळ हवा असल्याने आरोपींची आणखी पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली. त्यानुसार कल्याण न्यायालयाने या आरोपींच्या पोलिस कोठडीत वाढ करत दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# ठाणे शहरातील १५० बसगाड्यांमधील सीसीटीव्ही सुविधा बंद

**ठाणे (सम्यक कासारे) :** कुर्ला येथील बेस्टच्या अपघातानंतर प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला असतानाच आता ठाणे परिवहन विभागाच्या १५० टीएमटी बसगाड्यांमधील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यन्वयित नसल्याचे समोर आले आहे. तांत्रिक बिघाडामुळे काही सीसीटीव्ही बंद असल्याचे टीएमटी परिवहन व्यवस्थापकांनी सांगितले. यामुळे टीएमटी परिवहनाच्या बसगाड्यांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

कुर्ला येथे बेस्टच्या एका बसगाडीने भरधाव वेगात अनेक वाहनांना धडक देत काही पादचाऱ्यांना उडवले होते. या दुर्घटनेत सात लोकांचा मृत्यू झाला असून ४९ लोक जखमी झाले. या अपघातामुळे मुंबईसह अनेक शहरे हादरल्याने आता प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला असतानाच आता ठाणे परिवहन विभागाच्या १५० टीएमटी बसगाड्यांमधील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यन्वयित नसल्याचे समोर आले आहे. तांत्रिक बिघाडामुळे काही सीसीटीव्ही बंद असल्याचे सांगण्यात आले आहे.



ठाणे परिवहन (टीएमटी) व्यवस्थेत २०१९ पासून बसगाड्यांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आली होती. सुरुवातीला ५० नवीन बसगाड्यांमध्ये ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. पुढे तयार होणाऱ्या प्रत्येक नवीन बसमध्येही सीसीटीव्ही यंत्रणा बसवली जाते. सध्या काही तांत्रिक बिघाडांमुळे या यंत्रणा बंद आहेत. या यंत्रणा पुन्हा कार्यरत करण्याचे काम सुरु आहे.

**- भालचंद्र बेहेरे, टीएमटी परिवहन व्यवस्थापक**

बसगाड्यांमध्ये बसणाऱ्या प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, मागील काही दिवसांपासून या यंत्रणांची देखभाल आणि वेळेत दुरुस्ती न झाल्यामुळे यंत्रणा कार्यरत नाहीत. सीसीटीव्ही यंत्रणा बंद असल्यामुळे चोरी, छेडछाड आणि अन्य प्रकारच्या अनुचित घटना वाढण्याची शक्यता आहे. काही दिवसांपुर्वी टीएमटी बसगाडीमध्ये दुपारच्या सुमारास गर्दुल्यांनी चाकू दाखवून एका वाहकास धमकावल्याची चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये होती. त्यामुळे टीएमटी प्रवासी सेवेतील कर्मचारीही सुरक्षित नसल्याचे दिसून येत आहे. शहरातील अनेक बस स्थानकांवर आणि बसगाड्यांमध्ये मद्यधुंद किंवा अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या गर्दुल्यांचा वावर वाढला आहे. गर्दुल्यांकडून वाहकांना चाकू दाखवून धमकावण्याचे प्रकार समोर येत आहेत. अनेक बसमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा नसल्यामुळे गुन्हेगारीच्या घटना नोंदवणे कठीण झाले आहे.




ग्लोबल फोकस ऑलिम्पियाड (जीएफओ) राज्यस्तरीय स्पर्धेत पी एस देशमुख मेमोरियल अकॅडमी शहापूर येथील शाळेतील **कु. मयंक हिरामण वेखंडे** यास - इयत्ता ३ री मधून **राष्ट्रीय पुरस्कार २०२४** मध्ये **प्रथम क्रमांक** प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदन (एकूण २०० मार्क पैकी १८९)

**लोकरक्षणायचा प्रवास , प्रगतीचा ध्यास**

# अभिनेत्री प्राजक्ता माळीला चहाच्या गोष्टीचे व्यसन



अभिनय, नृत्य व निर्माती अशा विविध भूमिकेतून स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री म्हणून प्राजक्ता माळीची ओळख आहे. अभिनेत्री प्राजक्ता माळी अनेकविध कारणांमुळे चर्चांचा भाग बनते. कधी तिच्या नवनवीन प्रोजेक्टमुळे, तर कधी सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्ट व फोटोंमुळे अभिनेत्री चर्चेत असलेली दिसते. याबरोबरच प्राजक्ता माळीने केलेली वक्तव्ये बऱ्याचदा चर्चेत असतात. सध्या ती 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या विनोदी कार्यक्रमाचे होस्टिंग करताना दिसत आहे. यावेळी ती करत असलेल्या कमेंट्सने प्रेक्षकांचे लक्ष वेधताना दिसते. आता प्राजक्ताने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत केलेले वक्तव्य चर्चेत असल्याचे दिसत आहे.

**काय म्हणाली प्राजक्ता माळी?**

अभिनेत्रीने नुकताच सकाळ प्रीमिअरशी संवाद साधला. यावेळी तिने ती जर अभिनेत्री नसती तर तिचे वजन ७० किलो असते असे म्हटले. याबरोबरच मी प्रचंड फूडी आहे, असेही अभिनेत्रीने म्हटले. याच मुलाखतीत अभिनेत्रीने पुढे म्हटले, "तूळ राशीच्या व्यक्तींना एक तरी व्यसन असतंच. कारण ती विलासी रास आहे. मला चहाचे व्यसन आहे. बाकी कुठल्याच पदार्थाला चहाचा मान नाही. मला हल्ली चहाचा त्रास होतोय, पण मी चहा सोडू शकले नाही. पण, मी चहा दोनच कप पिते. मला माझ्या जवळचे लोक ओरडतात. मी त्यांना म्हणते की, दोनच कप चहाने काय त्रास होणार आहे. त्रास होतोय, पण मी मान्य करत नाही", असे म्हणत चहा प्रचंड आवडत असल्याचे प्राजक्ता माळीने म्हटले आहे.

**बायकांनी बायकांना पाठिंबा...**

प्राजक्ता माळीने या मुलाखतीत महिलांनी इतर महिलांना पाठिंबा दिला पाहिजे असे मत व्यक्त करत म्हटले, "बायकांनी बायकांना पाठिंबा देणे गरजेचे आहे. आपणच किती दिवस समान हक्क पाहिजे वगैरे म्हणत भांडत बसणार? बायका इतर बायकांना समान हक्क देतात का? बाई म्हणून तुम्ही इतर बाईला पाठिंबा देणार नाही, तोपर्यंत आपण इतर जेंडरकडून ती अपेक्षाच करू नये. तुम्ही तुमच्यापासून सुरुवात केली पाहिजे, असं मला नेहमीच वाटत आलं आहे. विशेषत: इंडस्ट्रीमधील कॅट फाइट्स जास्त प्रसिद्ध होतात. महिला जरी एकमेकांच्या स्पर्धक असला तरी निखळ मैत्री असू शकते. मला असं वाटतं की, यामध्ये वाढ झाली पाहिजे. जागरूकता निर्माण झाली पाहिजे. बायका-बायकांमधील स्पर्धा, इर्ष्या बाजून ठेऊन मैत्रभाव जास्त आला पाहिजे, तरच बायकांचा स्ट्रगल कमी होईल", असे म्हणत अभिनेत्रीने महिलांनी इतर महिलांना प्रोत्साहन देणे गरजचे असल्याचे म्हटले आहे.

काही दिवसांपूर्वीच आणखी एका मुलाखतीत प्राजक्ता माळीने मी बॉस असणं अनेकांना खुपलं असे म्हटले होते. याबरोबरच 'फुलवंती' चित्रपटात काम करण्याचा अनुभव सांगताना अभिनेत्रीने म्हटले होते, "फुलवंती हा टायटल रोल मला मिळाला. या चित्रपटामुळे माझं नृत्यकौशल्य समोर आलं. बऱ्याच लोकांनी माझे बरेच चित्रपट पाहिलेले नाहीत; परंतु हा चित्रपट बहुतांश लोकांनी पाहिला. त्यामुळे माझं अभिनयकौशल्यही लोकांनी पाहिलं. माझं टॅलेंट दिसलं. या चित्रपटामुळे मला निर्माती म्हणून टॅग मिळाला. निर्माती म्हणून पहिला प्रोजेक्ट आणि तोही 'फुलवंती'चा मिळाला, त्यामुळे मी देवाची ऋणी राहीन", असे म्हणत अभिनेत्रीने कृतज्ञता व्यक्त केली होती. आता ती कोणत्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# रेश्मानंतर 'रंग माझा वेगळा' मालिकेतील सोनाली साळुंखे अभिनेत्रीने बांधली लग्नगाठ!

'रंग माझा वेगळा' या 'स्टार प्रवाह' वाहिनीवरील मालिकेने जवळपास ४ वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं. या मालिकेतील प्रत्येक पात्र घराघरांत लोकप्रिय झाली होती. नुकताच या मालिकेत प्रमुख भूमिका साकारणाऱ्या रेश्मा शिंदेचा लग्नसोहळा थाटामाटात पार पडला. रेश्मा-पवन २९ नोव्हेंबरला विवाहबंधनात अडकले. आता रेश्मा पाठोपाठ या मालिकेतील आणखी एका अभिनेत्रीने प्रेक्षकांना आनंदाची बातमी दिली आहे.

गेल्या काही दिवसांत रेश्मासह, किरण गायकवाड, शाल्व किंजवडेकर, निखिल राजेशिर्के, कौमुदी वलोकर असे बरेच कलाकार लग्नबंधनात अडकले. आता या यादीत आणखी एका अभिनेत्रीचं नाव जोडलं जाणार आहे. 'रंग माझा वेगळा' मालिकेत झळकलेली लोकप्रिय अभिनेत्री सोनाली साळुंखे नुकतीच लग्नबंधनात अडकली आहे.



**'रंग माझा वेगळा' फेम अभिनेत्रीचा पार पडला लग्नसोहळा**

सोनालीचा लग्नसोहळा २४ डिसेंबरला थाटामाटात पार पडला आहे. अभिनेत्री 'रंग माझा वेगळा' या मालिकेमुळे प्रसिद्धीझोतात आली होती. यामध्ये तिने अनिताची भूमिका साकारली होती. गेल्या अनेक वर्षांपासून सोनाली मराठी मनोरंजन विश्वात सक्रिय आहे. लग्नाचे फोटो शेअर करत तिने लोकेशनमध्ये धुळे शहराचं नाव नमूद केलं आहे. यावरून अभिनेत्रीचा लग्नसोहळा धुळ्यात पार पडल्याचं स्पष्ट होत आहे. अभिनेत्रीचा साखरपुडा यावर्षी एप्रिल महिन्यात धुळे येथेच पार पडला होता. आता सोनालीने लग्नगाठ बांधत आपल्या नव्या आयुष्याची सुरुवात केली आहे.

अभिनेत्री सोनाली साळुंखेने आजवर 'छोट्या बयोची मोठी स्वप्न', 'रंग माझा वेगळा', 'गाथा नवनाथांची', 'विघ्नहर्ता गणेशा' अशा विविध मालिकांमध्ये काम केलं आहे. याशिवाय तिने रंगभूमीवर देखील काम केलेलं आहे. आता आयुष्याच्या नव्या इनिंगला सुरुवात करत सोनाली लग्नबंधनात अडकली आहे.

सोनालीचा लग्नसोहळा धुळ्यात थाटामाटात पार पडला. विवाहसोहळ्याचे फोटो शेअर करत अभिनेत्रीने यावर '२४-१२-२४' असं कॅप्शन दिलं आहे. तिने लग्नात रॉयल लूक केल्याचं फोटोंमध्ये पाहायला मिळत आहे. सध्या संपूर्ण कलाविश्वातून अभिनेत्रीवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

# सलमान खानचं फार्महाऊस म्हणजे अय्याशीचा अड्डा?




बॉलिवुडचा दबंग अभिनेता सलमान खान नेहमीच वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असतो. त्याच्या सिकंदर या चित्रपटाचे टिझर लॉन्च होणार होते. मात्र आता ही लॉन्चिंग पुढे ढकलण्यात आली आहे. चित्रपटाचं शूटिंग झालं किवा मोकळा वेळ घालवायचा असेल तर सलमान खान त्याच्या फार्म हाऊसवर जातो. तिथे तो निवांत वेळ घावलतो. या फार्म हाऊसचे काही फोटो समोर आलेले आहेत. त्यामुळेच सलमान खानच्या फार्महाऊसमध्ये नेमकं काय चालत असेल? असा प्रश्न अनेकांना पडतो. यावरच सलमान खानने प्रतिक्रिया दिली होती.

सलमान खानचे हे फार्महाऊस एकूण १५० एकरच्या परिसरात वसलेले आहे. येथे सलमान खान निवांत वेळ घालवतो. सलमान खान त्याचा भाऊ अभिनेता अरबाज खानच्या एका पॉडकास्टमध्ये आला होता. याच पॉडकास्टामध्ये अरबाज खानने सलमानला या फार्महाऊसबद्दल सविस्तर विचारले होते. विशेष म्हणजे सलमान खाननेदेखील या फार्महाऊसबद्दल सविस्तर माहिती दिली होती. अनेकांना वाटते की सलमान ज्या फार्म हाऊसमध्ये राहायला जातो, तो त्याच्या स्वत:च्या मालकीचा आहे. मात्र खरं पाहायचं झाल्यास त्या फार्महाऊसची मालकी सलमान खानची बहीण अर्पिताकडे आहे. म्हणजेच तो फार्महाऊस अर्पिताचा आहे.

# चेंगराचेंगरीनंतर 'पुष्पा २'बद्दल नवा वाद, निर्मात्यांना यूट्युबवरून हटवावं लागलं 'हे' लोकप्रिय गाणं

अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २: द रूल' चित्रपटाबद्दलचे वाद थांबायचे नाव घेत नाहीत. एकीकडे प्रीमियरदरम्यान चेंगराचेंगरीत महिलेच्या मृत्यूबद्दल अल्लू अर्जुन आधीच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे, तर दुसरीकडे या चित्रपटाचे नवे गाणेही वादात अडकले आहे. नुकतेच टी-सीरिजने 'पुष्पा २' चे गाणे 'दमुंते पट्टुकोरा' यूट्यूबवर प्रदर्शित केले होते. 'अगर तुममें हिम्मत है, तो मुझे पकड़ लो, शेखावत!' ('जर तुमच्यात हिंमत असेल, तर मला पकडा, शेखावत!') असे या गाण्याचे बोल आहेत. या गाण्यात अल्लू अर्जुनचे 'पुष्पा' हे पात्र फहाद फासिलच्या शेखावत या पोलिस पात्राला खुलेआम आव्हान देताना दाखवले आहे. मात्र, नेटिझन्सनी हे गाणे प्रदर्शित करण्याच्या वेळेबद्दल प्रश्न उपस्थित केले आणि आश्चर्य व्यक्त केले. संध्या थिएटर चेंगराचेंगरीच्या तपासादरम्यान हे गाणे प्रसिद्ध करून निर्माते पोलिस अधिकाऱ्यांवर टीका करत आहेत का? असे म्हणत काही नेटिझन्सनी टीका केली. यामुळे हे गाणे नंतर यूट्यूबवरून काढून टाकण्यात आले.




**चेंगराचेंगरीत महिलेचा मृत्यू**

'पुष्पा २' च्या प्रीमियरदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाला. चाहत्यांना अभिवादन करण्यासाठी अल्लू अर्जुनने गाडीतून बाहेर येताच गर्दी पोलिसांच्या नियंत्रणाबाहेर गेली. या दुर्घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला, तर तिच्या मुलाला गंभीर दुखापत झाली असून तो अजूनही रुग्णालयात आहे.


**अल्लू अर्जुनला अटक**

या प्रकरणाच्या संदर्भात अल्लू अर्जुनला १३ डिसेंबर २०२४ रोजी अटक करण्यात आली. त्याला राहत्या घरातून ताब्यात घेऊन १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले. त्यानंतर त्याला ४ आठवड्यांसाठी अंतरिम जामीन मिळाला. मात्र, कागदपत्रांच्या विलंबामुळे अल्लू अर्जुनला एक रात्र तुरुंगात घालवावी लागली.

**घरावर हल्ला**

दरम्यान, चेंगराचेंगरीत मृत्यू झालेल्या महिलेला आणि तिच्या रुग्णालयात असणाऱ्या मुलाला न्याय मिळावा यासाठी अल्लू अर्जुनच्या घराबाहेर आंदोलक जमले होते. त्यांनी त्याच्या घराची तोडफोड केली आणि प्रॉपर्टीचे नुकसान केले.

# अनंत अंबानीने २ कोटींचे घड्याळ न दिल्याने प्रसिद्ध गायक नाराज



गायक मिका सिंग या वर्षाच्या सुरुवातीला अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या लग्नात परफॉर्म करण्याबद्दल व्यक्त झाला आहे. त्याच्या परफॉर्मन्ससाठी त्याला खूप जास्त मानधन मिळालं, मात्र अंबानींनी त्याला महागडं घड्याळ भेट न दिल्याने तो नाराज आहे. अंबानी कुटुंबाने अनंतचे जवळचे मित्र आणि बॉलीवूडमधील निवडक लोकांना दोन कोटी रुपये प्रत्येकी किंमत असलेले घड्याळ भेट दिले. द लल्लनटॉपला दिलेल्या मुलाखतीत मिकाने घड्याळ न मिळाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. "मी अनंत अंबानींच्या लग्नात परफॉर्म करायला गेलो होतो. त्यांनी प्रत्येकाला भरपूर पैसे वाटले, अगदी मलाही. पण मला एका गोष्टीची नाराजी आहे. त्यांच्या काही जवळच्या लोकांना जे घड्याळ मिळालं ते मला मिळालं नाही," असं मिका म्हणाला. जर अनंत अंबानीने ही मुलाखत पाहिली तर मला ते महागडं घड्याळ भेट देण्याचा विचार करावा, असं मिकाने म्हटलं. मिकाने त्याला किती मानधन मिळालं, त्याचा आकडा सांगितला नाही. मात्र, अनंत-राधिकाच्या लग्नात परफॉर्म केल्यावर मिळालेल्या मानधनात तो पुढील पाच वर्षे आरामात जगू शकतो, असं तो म्हणाला. "मला खूप जास्त मानधन दिलंय, पण ही रक्कम किती होती हे मी सांगू शकत नाही. पण तुम्हाला अंदाज यावा यासाठी सांगतो की मला इतके पैसे मिळाले की मी त्यात पाच वर्षे सहज जगू शकेन. माझा फार खर्च नाही. त्यामुळे मी त्या पैशातून पाच वर्षे आरामात राहू शकतो," असं मिकाने नमूद केलं. मिकाने लग्नासारख्या खासगी कार्यक्रमांमध्ये परफॉर्म करून कलाकार पैसे कमवतात, याकडे लक्ष वेधले. स्वतःचे आणि त्याचा भाऊ दलेर मेंहदी यांचे उदाहरण देत तो म्हणाला, "आम्ही दोघे भाऊ जेव्हा लग्नात गायचो तेव्हा लोकांना वाईट वाटायचं की आम्ही लग्नात गातो. पण आता प्रत्येकजण लग्नात गातोय. कोणीही मोठ्या शोमध्ये जाऊन परफॉर्म करत नाही. आता सगळे लग्नात गाऊन सर्व पैसे कमवत आहेत."

मुकेश अंबानी यांनी अनंतच्या मित्रांना तसेच अभिनेता शाहरुख खान आणि रणवीर सिंग यांना ऑडेमार्स पिग्युट लिमिटेड-एडीशन लक्झरी घड्याळं भेट म्हणून दिली होती.

# वल्लरी आणि विराजच्या आयुष्यात घडलेली ही गोष्ट !

जसं नवीन वर्ष काही न काही घेऊन येतं तसंच जाणारं वर्ष खूप काही देऊन ही जातं. मालिका विश्वातली सध्या प्रेक्षकांच्या मनात गाजत असलेली मालिका 'नवरी मिळे हिटलरला' मधली नायिका लीला म्हणजेच वल्लरी विराज ने २०२४ वर्ष तिच्यासाठी किती खास होत हे व्यक्त करताना सांगितले. "नवरी मिळे हिटलरलाचा पहिला प्रोमो १४ फेब्रुवरी २०२४ ला आला होता, ती आठवण माझी या वर्षातली बेस्ट आहे कारण त्याच दिवशी माझ्यासोबत आणखीन छान गोष्टी घडल्या होत्या. माझ्या फिल्मचा ट्रेलर आणि गाणं ही रिलीज झाले होतं. माझ्यासाठी तो खूप मोठा दिवस होता. खरतर तो दिवस मला आता ही लक्षात आहे मी त्यादिवशी एका कामासाठी कुठेतरी बाहेर होते गाडीत प्रवास करत असताना मला झी मराठीच्या



सोशल मीडिया पेजवरून मेसेज आला होता आणि तो मेसेज होता 'नवरी मिळे हिटलरला' मालिकेच्या पहिल्या प्रोमोचा. तो क्षण माझ्या स्मरणात सदैव राहील. या व्यतिरिक्त २०२४ मध्ये शूटिंग आणि प्रोमोशनच्या धावपळी मध्ये माझं तब्यतीकडे खूप दुर्लक्ष झालय,पण मी आता बदल घडवत आहे, हळूहळू करून वेळेवर जेवण, थोडा व्यायाम या गोष्टींकडे लक्ष देत आहे".

# कमल हासन व सारिका यांच्या घटस्फोटावर व्यक्त झाली श्रुती हासन

अभिनेत्री श्रुती हासन ने नुकतीच पिंकविलाच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिने तिच्या आई-वडिलांच्या घटस्फोटावर भाष्य केले. दिग्गज अभिनेते कमल हासन व सारिका यांची ती मुलगी आहे. वडिलांप्रमाणेच तिने अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले व स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. आता अभिनेत्रीने आई-वडिलांच्या घटस्फोटानंतर कोणत्या गोष्टींची जाणीव झाली, कोणते धडे मिळाले याबद्दल वक्तव्य केले आहे.

श्रुतीने म्हटले, "मी एका सुंदर कुटुंबात जन्माला आले. हुशार, कलात्मक क्षेत्रात काम करणारे पालक आणि देवाच्या कृपेने खूप सुखसोयी होत्या. पण, मी याची दुसरी बाजूदेखील बघितली आहे. जेव्हा माझे पालक वेगळे झाले, तेव्हा सगळे काही बदलले. त्यावेळी मला आर्थिक स्वातंत्र्य, एखाद्या व्यक्तीवर अवलंबून असलेले स्वातंत्र्य या गोष्टींची जाणीव झाली, त्याचे महत्त्व कळले. विशेषत: एक मुलगी म्हणून आणि आई या लग्नातून बाहेर पडली, त्यावेळी मला महिलेने स्वतंत्र असणे का महत्त्वाचे आहे याचा धडा मिळाला."

पुढे श्रुतीने महिलांचे स्वतंत्र असण्याचे महत्त्व अधोरेखित करत म्हटले, "पुरुषांचे स्वातंत्र्य मोठ्या प्रमाणात साजरे केले जाते, हे आपण नेहमी पाहतो. मला हे सांगायला आवडेल की, आपण स्वतंत्र फेमिनिस्ट आहोत, हे घोषित करायची गरज नाही. आपल्याला हे दररोज करायचे नाही. ही अतिशय शांतपणे लढली जाणारी लढाई आहे. अनेक स्त्रियांना हे पटेल की कोणीही आपले कौतुक करत नाही, ते आपण स्वत:च करू शकतो." कमल हासन व सारिका यांच्या घटस्फोटाबद्दल बोलताना अभिनेत्रीने म्हटले, "त्यांचा घटस्फोट आमच्यासाठी वेदनादायी होता. पालकांचा घटस्फोट होणे हे मुलांसाठी तसेच पालकांसाठी दु:खदायक आहे. आज अनेक घरांत हे सामान्य झाले आहे. आई-वडील वेगळे होतानाच वेदना होतात असे नाही. अशी अनेक घरे आहेत, जिथे समाजासाठी पालक एकत्र राहतात. कधीकधी त्या घरांमध्ये जास्त त्रास होतो, कारण त्या वेदना उघड केल्या जाऊ शकत नाही."

आई-वडिलांबद्दल बोलताना श्रुती हासनने म्हटले, "जेव्हा ते एकत्र होते आणि आनंदात होते, त्यावेळी मी आतापर्यंत पाहिलेले ते सगळ्यात सुंदर जोडपे होते. कारण ते एकत्र काम करायचे, एकत्र सेटवर जायचे. माझं संपूर्ण कुटुंब चित्रपटसृष्टीत काम करत होतं. माझी बहीणसुद्धा असिस्टंट डायरेक्टर विभागात होती."

पुढे श्रुतीने असेही म्हटले, "जेव्हा त्यांना वाटले की ते एकमेकांबरोबर राहू शकत नाहीत, त्यावेळी ते एकमेकांशी बोलले आणि निर्णय घेतला. त्यांनी एकत्र राहण्याचा खूप प्रयत्न केला, पण ते राहू शकले नाहीत.



## राशी भविष्य




**मेष** – आजचे काम उद्यावर टाकू नका. प्रयत्नाने पुढे जाता येईल. घरातील कुरबुरींमध्ये लक्ष घालू नका.

**वृषभ** – मित्र अथवा नातेवाईकांमध्ये पैशांचे व्यवहार होतील. रागावर नियंत्रण ठेवणे हिताचे ठरेल. महत्त्वाची चर्चा करता येईल.

**मिथुन** – कोर्टाच्या कामात यश मिळेल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींचा सल्ला आपणास लाभदायक ठरण्याचे संकेत आहेत.

**कर्क** – प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. आपल्या कामाचे कौतुक केले जाईल. धंद्यातील वाटाघाटीत यश मिळेल.

**सिंह** – अडचणीतून आपला मार्ग शोधावा लागेल. नोकरी-उद्योगधंद्यात यशस्वी व्हाल. आपला स्वाभिमान जपा.

**कन्या** – नोकरीत तुमचे कर्तृत्व दिसेल. जुने मित्र भेटतील. अपेक्षित यशासाठी प्रयत्नांची कास सोडू नये.

**तुळ** – शक्यतो आर्थिक व्यवहारात सावध राहा. जोडीदाराची उत्तम साथ लाभेल. कर्जातून दिलासा मिळू शकेल.

**वृश्चिक** – मानसिक शांतता आणि प्रसन्नता लाभेल. समोरच्या व्यक्तीचे म्हणणे, सूचना आणि सल्ला ऐकून घेणे हिताचे ठरेल.

**धनु** – कौटुंबिक वातावरण उत्साही व आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करावा. विनम्रता यशकारक ठरेल. ठरवलेले काम वेळेत पूर्ण कराल.

**मकर** – कठीण प्रसंगावर मात करावी लागेल. धंद्यातील प्रश्न सोडवता येईल. भौतिक सुखाचा आनंद घ्याल.

**कुंभ** – कोणताही निर्णय घेताना जोडीदाराचा सल्ला घ्यावा. वैवाहिक जीवन सुखकारक राहील. नोकरी-व्यवसायात बदल जाणवतील.

**मीन** – कौटुंबिक जबाबदाऱ्या सक्षमतेने पार पाडाल. विनाकारण खर्चावर नियंत्रण ठेवावे. गुंतवणुकीतून लाभ मिळतील.

# साताऱ्यात पोलिसांची वकिली आली डिपार्टमेंटच्या अंगलट

**सातारा (दिगंबर जाधव) :** सातारा जिल्ह्यात एखाद्या व्यक्तीवर अन्याय होत असेल तर त्याला पोलीस ठाण्याची धाव घ्यावी लागते. काही वेळेला तपास यंत्रणेनंतर आरोपीची व फिर्यादीची न्यायालयात बाजू मांडावी लागते. अशावेळी वकील देणे निर्विवाद असते. परंतु, सातारा जिल्ह्यात अनेक पोलीस विशिष्ट वकिलांची शिफारस करत आहेत. त्यामुळे पोलिसांची वकिली आता डिपार्टमेंटच्या अंगलट आली आहे. याबाबत पहिला उठाव वाई, पाचगणी, महाबळेश्वर येथील वकिलांनी करून खऱ्या अर्थाने आपल्या व्यवसायालाच न्याय देण्याची भूमिका घेतली. त्याची आता चर्चा सुरू झालेली आहे.

सध्या सातारा जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी व तपास यंत्रणेतील हलगर्जीपणा आणि विशेष बाब म्हणजे तपास अधिकारी आणि काही वकील यांचे साटेलोटे उघड करण्याचे काम वकील मंडळींनीच केल्यामुळे अनेक पक्षकारांनी धन्यवाद दिले आहेत.

सातारा जिल्ह्यात पोलीस ठाण्यामध्ये किरकोळ गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण कमी असले तरी अनेक गुन्हे उघडकीस येण्यापूर्वीच त्याची भ्रूणहत्या केली जाते. काही वेळेला आरोपींना टेबल जामीन मिळवून देण्यासाठी पोलीसच न्यायालय चालवतात की काय? असाच ही अनुभव राजकीय हितसंबंध व आर्थिक निकषावर



जामीन मिळालेल्या काही गुन्हेगारांनी बोलून दाखवलेला आहे. शेवटी गुन्हेगाराला शिक्षा झाली पाहिजे.त्यासाठी प्रामाणिकपणे तपास करणे व न्यायालयापुढे पुरावे सादर करणे अशी कामगिरी प्रामाणिक तपास अधिकारी करत असतात. त्यामुळे समाजामध्ये गुन्हे रोखण्याचे काम होत आहे. हे त्रिवार सत्य आहे.

मात्र, जिथे मलिदा गँग निर्माण झालेली आहे. ती एक तीळ सात जणांत वाटून खाते. पोलीस ठाण्यात आलेल्या तक्रारीनंतर न्यायालयात बाजू मांडण्यासाठी राजकीय वरदहस्त लाभलेल्या वकिलांची शिफारस केली जाते. विशेष बाब म्हणजे गुन्हेगारी क्षेत्रामध्ये गुन्हेगारांची बाजू मांडणारी व कायद्याचा अभ्यास करणारी मंडळी निरापराधी आरोपीला शिक्षा होऊ नये. म्हणून काम करतात. परंतु, काही वेळेला पुराव्या अभावी अनेकांना शिक्षा सुद्धा होते तर काहींना पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली जाते . पुरावा ग्राह्य मान्य हे न्यायालयाचे काम आहे.अशा काही नामांकित वकील मंडळींचीच सातत्याने एखाद्या पोलिस ठाण्यामध्ये उठा बस वाढली की शंका घेण्यास वाव असतो. वाई वकील संघटनेने याविरुद्ध आवाज उठवून खऱ्या अर्थाने लोकशाहीतील एका स्तंभाची बुज राखली आहे. त्यांचे सर्व बाजूने कौतुक होत आहे. वाई वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड .रवींद्र भोसले उपाध्यक्ष अँड .भारती कोरवार सचिव ॲड. अक्षय भांडवलकर व संघाच्या सदस्यांनी दमदार पाऊल उचललेले आहे. आता सातारा जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक व वरिष्ठ अधिकारी याबाबत काय भूमिका घेतात? याकडे मूठभर लोकांचेच लक्ष लागलेले आहे.

# महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत रंगमित्र इंदापूरचे 'यातायात' नाटक सादर

**इंदापूर (अभिजीत येरल्लू)** - ६३ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत ठाणे या केंद्रावर डॉ काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात रंगमित्र सांस्कृतिक कला मंडळ इंदापूर यांनी आपल्या दमदार अभिनयाने ' यातायात ' हे दोन अंकी नाटक सादर केल.



दर वर्षी रंगमित्र सांस्कृतिक कलामंडळ इंदापूर राज्यं नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवित असते ज्यात मोठ्या कलाकारांचे दोन अंकी नाटक,लहान मुलांसाठी बालनाट्य या कलेच्या माध्यमातून इंदापूर आणि इतर ग्रामीण भागातील कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न हे मंडळ सातत्याने करत आले आहे.या वर्षी ६३ व्या राज्य नाट्य स्पर्धेत या मंडळाने सादर केलेलं यातायात हे नाटक प्रेक्षकाच्या पसंतीस आग्रणी ठरले लेखक अमोल कुलकर्णी,बुलढाणा यांनी हे नाटक लिहिले असून रंगमित्रचे प्रणय इंगळे सर यांनी दिग्दर्शित केले आहे.

नेहमीच्या आपल्या जगण्याच्या प्रवासात आपण एकमेकांशी आपली सुख दुःख वाटत राहिलो तर आपलं जगणं खुप सुसह्य होत हेच ह्या नाटकात गूढ पण तितकेच रोमहर्षक प्रसंगातून दाखवलं आहे. बाजूच्या गावातून शहरांत ऑफिस ला अप-डाउन करणारे पाच कर्मचारी रेल्वे च्या प्रवासात एक गंभीर अडचण निर्माण होते. आशा प्रसंगात एकमेकांना आपली सुख दुःख वाटून ताण कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न आणि धडपड यांच्या वैविध्यपूर्ण घटनाक्रमाने नाटक प्रेक्षकांना श्वास रोखून धरायला भाग पडते सोबतच गमतीदार संवादाने प्रेक्षकांना खिळवून ठेवते यातूनपुढे पुढे त्यांची ह्या संकटातून सुटका होते की नाही या उत्कंठेतून प्रेक्षक नाटकात समरस होऊन जातात. या नाटकात प्रणय इंगळे, शिवम सागवेकर ,निर्भय भोपी ,राकेश पवार ,किरण केळूसकर ह्यांचा दर्जेदार अभिनय पाहायला मिळतो.

SPORT

# Rohit Sharma, please retire: Fans hurt after India captain fails in MCG Test

A section of fans vented their frustration after India captain Rohit Sharma was dismissed for another low score, this time in the first innings of the much-anticipated Boxing Day Test in



Melbourne. Rohit was dismissed for 3 as early as the second over of the Indian innings. He did not appear fully focused, falling to a loose shot on Day 2 of the Test match.

The poor run of form with the bat continued as the Indian captain's return to the top of the order ended in disappointment. Rohit played a tentative half-pull to a delivery from Pat Cummins that pitched short and held up slightly on the surface.

The India captain has managed only 22 runs in four innings so far in the series, with scores of 3, 6, 10, and 3. Rohit appeared low on intensity, and his shot lacked conviction, ending his five-ball stay at the crease.


Questions have been raised about Rohit Sharma's contributions to the Test team, particularly after he moved down to the middle order and failed with the bat in Adelaide and Brisbane. Rohit had opted not to open the innings to allow KL Rahul and Yashasvi Jaiswal to play at the top of the order. However, in Melbourne, the batting order was reshuffled after India dropped Shubman Gill, and Rohit returned to the top of the order, only to fail to make an impact.

Rohit Sharma missed the first Test of the Border-Gavaskar Trophy and India, under the leadership of Jasprit Bumrah, went on to hammer Australia by 295 runs in Perth. Since Rohit returned to the side in Adelaide, things have not worked out in India's favour.

Earlier in the day, Rohit Sharma's captaincy was questioned over his usage of bowlers as Australia went on to make a massive total of 474 in their first innings.

# Yuki Bhambri unavailable, Sumit Nagal may skip too

**PUNE:** Yuki Bhambri continues to be unavailable while Sumit Nagal too is expected to stay away for India's Davis Cup World Group playoff tie against Togo, to be held at the DLTA Complex in New Delhi on Feb 1-2. "Yuki (Bhambri) has expressed his regret (over not being available) while Sumit is yet to respond," AITA honorary secretary Anil Dhupar said on Thursday.



"The team selection is tomorrow, so there is still time for Sumit to respond," he added. Both Nagal and Bhambri had made themselves unavailable for the World Group I tie against Sweden in Stockholm in September when Rohit Rajpal's side was thrashed 4-0. The tie against Togo is scheduled close on the heels of the Australian Open.

Togo, a tiny West African country, has just one ranked player on the men's pro circuit — 29-year-old Thomas Setodji ranked 1259th on the ATP charts. But Setodji has a 9-3 singles record and 7-0 in doubles in 10 ties, having led Togo to a 4-0 drubbing of Latvia in their most recent tie.

# Ravi Shastri, Sunil Gavaskar Criticise India's Tactics & Team Selection In IND vs AUS Boxing Day Test

**Melbourne:** Former India head coach Ravi Shastri has questioned the Rohit Sharma-led side over playing two spinners in Ravindra Jadeja and Washington Sundar if they weren't to be trusted much with bowling duties in the ongoing Boxing Day Test against Australia at the Melbourne Cricket Ground.

In India bowling out Australia for 474, as Steve Smith top-scored with 140, left-arm spin all-rounder Jadeja picked 3-78 in 23 overs while off-spin all-rounder Sundar, brought in for Shubman Gill in the playing eleven, bowled only 15 overs and took 1-49. Both Jadeja and Sundar got to bowl only after 40 overs were done on day one's play.

"I thought the bowling was pretty ordinary. They ran out of ideas, India. Spin wasn't used as much as it should have. It took a gap of 40 overs before Jadeja was introduced into the attack.

"It took a long time for Washington Sundar to bowl his first over. So when you're playing two spinners, you have to ask the question, why did you play two spinners? What



was the need if you don't trust them?" said Shastri on Star Sports.

He also called India's bowling performance ordinary and pointed out that they looked bereft of ideas in stopping a sparkling Australian batting performance. "I think India ran out of ideas. There's absolutely no doubt about that. Because what Australia did was, there would have been a game plan.

"Let's make sure we don't lose too many wickets in that first 45 minutes. Try and get another 50 runs on the board. They were 311 for 6. Their first aim would have been 350. But the rate at which they scored the runs made the job far easier," he added.

Legendary India batter Sunil Gavaskar felt the second new ball was 'wasted' by India's bowlers. "Pretty ordinary bowling. If you have to bowl a bouncer, you get it around the helmet's badge and not around the waist.

"I'm very disappointed, I'm sorry. This new ball had been wasted. Akash Deep was all over the place. He wasted the new ball by bowling way outside the off stump. The Indians had also been sloppy in the field," said Gavaskar.



## Doping Hits Tennis Again: US Open Doubles Champion Suspended

**New Delhi -** The spectre of doping has hit tennis yet again, and this time, two-time Grand Slam-winning doubles player Max Purcell was caught in the net and entered a voluntary provisional suspension under tennis' anti-doping rules. The International Tennis Integrity Agency made an announcement in a statement on Monday after the 26-year-old Australian admitted to violating Article 2.2 of the Tennis Anti-Doping Program "relating to the use of a Prohibited Method".

"The International Tennis Integrity Agency (ITIA) today confirms that Australian tennis player Max Purcell has elected to enter into a voluntary provisional suspension under the Tennis Anti-Doping Program (TADP)," the statement said.

# How 30 minutes of madness spoilt Virat-Yashasvi's hard-work on Day 2

**New Delhi -** India's late batting collapse in the final session undid all the hard work put in by Yashasvi Jaiswal and Virat Kohli to hand Australia the advantage on Day 2 of the Boxing Day Test. Things were looking promising for big scores from Jaiswal and Virat, but a major mix-up between the two well-set batters drastically shifted the momentum, handing Australia a significant advantage.

At one stage, India were cruising at 153 for 2, with Yashasvi Jaiswal and Virat Kohli adding a solid 102 runs for the third wicket. However, 30 minutes of madness led to India staring down a barrel at 164 for 5 as the tourists lost three wickets in the next 11 runs. India are still 310 runs behind Australia's first-innings total of 474 and need another 111 runs to avoid the follow-onâ scenario that should never have been a concern on such a placid batting track.

autam Gambhir's decision to send in Akash Deep as a nightwatchman proved to be one of several questionable calls the head coach made during this game. It was a rush-of-blood moment for Yashasvi Jaiswal, who got dismissed for 82 after an unfortunate mix-up with his senior partner Kohli. Cricket's unpredictability was on full display in a matter of moments. Jaiswal pushed a ball towards mid-on and called for a quick single, with an assured Kohli (on 36) at the other end. Kohli took a step and a half forward before retreating.

Pat Cummins pounced on the ball and threw accurately to the striker's end, leaving a frustrated Jaiswal visibly mouthing "my call" to his idol. The incident might go down as a defining moment, with Kohli later reflecting, perhaps, that a loud "No" could have allowed Jaiswal to return safely. After Jaiswal's dismissal, the MCG crowd rallied fervently behind Australia and their hometown hero, Scott Boland, who capitalised on India's nervousness in the final half-hour with an inspired spell. The run-out appeared to break Kohli's focus.After 85 assured balls, he poked at one delivered in the corridor of uncertainty, ending his promising 36-run innings.



# रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळे पर्यटकांनी गजबजली

## हॉटेल ८०टक्के फुल्ल; जिल्हा प्रशासन सज्ज

● अलिबाग, दिगंबर जाधव :

नाताळ सण साजरा करण्यासोबत सरत्या नवीन वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी रायगड जिल्हा सज्ज आहे. रायगड जिल्ह्यात मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले असून सर्व पर्यटन स्थळे पर्यटकांनी बहरली आहेत. ठीक ठिकाणी मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात व्यावसायिक व्यस्त आहेत. जिल्ह्यातील हॉटेलमध्ये ८०% बुक असल्याने आता आयत्यावेळी बुकिंग करण्यासाठी पर्यटकांना जादा पैसे मोजावे लागत आहेत. पर्यटकांची संख्या वाढल्याने मासळीच्या मागणी वाढ झाली असून मासळीचे दर वाढले आहेत. जिल्ह्यातील मुंबई गोवा महामार्गाची दुरुस्त झाले असून पर्यटकांना निश्चित स्थळी पोहोचण्यासाठी वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. नव वर्ष स्वागता दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे.



नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटकांनी रायगड जिल्ह्याला पसंती असून रायगड जिल्ह्यात पर्यटक दाखल होऊन लागले आहेत. शनिवारपासून पर्यटकांचा संख्येत आणखी भर पडणार आहे. आपल्याकडे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटनपूरक व्यवसायांनी विविध उपक्रम राबविले आहेत. रायगड जिल्ह्यात नववर्ष स्वागत करण्यासाठी पर्यटकांनी पंधरा दिवस आधीच हॉटेल कॉटेज लॉज मधील रूमचे आगाऊ बुकिंग करून ठेवले आहे. प्रमुख पर्यटन स्थळांवरील राहण्याचे बुकिंग याआधी झाल्याने आयत्यावेळी नववर्ष स्वागत साठी रायगड जिल्ह्यात येण्याचे बेत केलेल्या पर्यटना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. यासाठी रूम मिळवताना त्यांच्या नाकी नऊ येत असून हॉटेल कॉटेज लॉज व्यवसायिकांकडून रूम साठी जागा दर आकारले जात आहे. यामुळे पर्यटकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

नाताळ व सरत्या वर्षाला निरोप देताना अति उत्साह काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रायगड पोलीस दलाकडून कडे कोड बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. सर्व समुद्र किनारे मार्केट परिसर तसेच महत्त्वाच्या ठिकाणी बंदोबस्त नेमण्यात येणार आहे. महिलांची छेडछाड करणाऱ्यांवरून ठेवण्यासाठी दामिनी पथक बीड मार्शल तसेच साध्या गणेशातील पोलीस ठिकठिकाणी नेमले जाणार आहेत. त्यामध्ये होमगार्डचाही सहभाग असणार आहे. पोलीस अधीक्षक कार्यातील राखीव पोलिसांचा बंदोबस्त नेमण्यात येणार आहे.

### या ठिकाणांना पसंती

- समुद्रकिणारे: अलिबाग, किहीम, वर्सोली मांडवा, काशीद, मुरुड दिवेआगार ,श्रीवर्धन
- धार्मिक स्थळे: पाली बनल्यालेश्वर, महड वरद विनायक, हरिहरेश्वर शंकर ,सालाव बिर्ला मंदिर
- गड किल्ले: रायगड ,जंजिरा, कुलाबा कोर्लई
- थंड हवेचे ठिकाण: माथेरान

### मासळीचे दर महागले


■ बदलते हवामान वाढते प्रदूषण त्यामुळे समुद्रात पुरेसा प्रमाणात मासे मिळत नसल्याने मच्छीमार सांगतात. त्यातच नव वर्ष स्वागतासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक आले आहेत. यामुळे मासलीच्या मागणीत प्रचंड वाढ झाली आहे. मागणीच्या प्रमाणात पुरवठा कमी असल्याने मासेज दर वाढले आहेत. मागील महिन्याच्या तुलनेत ५० ते ६० टक्के मासळीचे दर वाढले आहेत. यामुळे पर्यटकांना मासळीवर ताव मारताना विचार करावा लागत आहे.


### मुंबई गोवा महामार्गाची दुरवस्था

■ अलिबाग मुरुड श्रीवर्धन महाड रोहा तालुक्यातील पर्यटन स्थळांवर पोहोचण्यासाठी पर्यटक मुंबई गोवा महामार्गाचा वापर करीत आहे. मुंबई गोवा महामार्गाचे चौपदरीकरण्याचे काम रखडले आहे. महामार्गावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. महामार्गावर पडलेल्या खड्डे व वाढलेली वर्दळ यामुळे पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. निश्चित स्थळी पोहोचण्यासाठी पर्यटकांना दीड ते दोन तासाचा जादा अवधी लागत असल्याचे चित्र दिसून येते.

# नोटीसीचा डोस मिळताच भामा आसखेड जलवाहिनीच्या कामाला वेग

● पिंपरी, सुचिता देशमुख :





शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या भामा आसखेड जलवाहिनीच्या कामाची चार वर्षांची मुदत संपूनही केवळ ४८ टक्के काम झाल्यामुळे महापालिकेने संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावली. नोटीस मिळताच ठेकेदाराने कामाचा कृती आराखडा सादर केला. काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदाराला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येणार आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर १६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी उपलब्ध होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला मावळातील पवना धरणातून पाणीपुरवठा करण्यात येतो. सध्या पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून तात्पुरत्या स्वरूपात इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यावरून ८०, एमआयडीसीकडून २० असे ६१० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणीपुरवठा केला जात आहे. मागील पाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. शहराची वाढती लोकसंख्या पाहता महापालिकेने मावळातील आंद्रा धरणातून १०० आणि खेड तालुक्यातील भामा आसखेड धरणातून १६७ असे २६७ एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन केले. खेड येथील वाकी तर्फे वाडा येथील अशुद्ध जलउपसा केंद्रापासून तळेगाव दाभाडे एमआयडीसीतील नवलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर टँकपर्यंत ७.३० किलोमीटर आणि तेथून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी नेण्यासाठी १८.८० किलोमीटर अंतर १४०० मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येत आहे.

या कामासाठी पाणीपुरवठा विभागाने २०२० मध्ये निविदा प्रक्रिया राबवून १५ डिसेंबर २०२० रोजी ऑफशोअर इंडिया लि. या ठेकेदाराला काम दिले. त्यासाठी १६२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. कामाची मुदत डिसेंबर २०२४ अशी चार वर्षांची होती. मात्र, या मुदतीत केवळ ४८ टक्के काम पूर्ण झाले.

### खडकामुळे जलवाहिनीला विलंब

■ जलवाहिनीचे काम सुरू असलेल्या मार्गावर खडक लागला आहे. त्यामुळे जलवाहिनीच्या कामाला विलंब होत आहे. तसेच ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमआयडीसी, वन, पाटबंधारे अशा विविध विभागांच्या जागा ताब्यात येण्यासाठी विलंब होत आहे. त्यामुळे काम पूर्ण करण्यात अडथळा येत असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते.

■ भामा आसखेड जलवाहिनीचे काम संथगतीने सुरू असल्याने ठेकेदारासोबत आयुक्त, अतिरिक्त आयुक्तांनी बैठक घेतली. संबंधित ठेकेदाराला नोटीस दिली. त्यानंतर ठेकेदाराने कामाला गती दिली आहे. वेगात जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यास प्राधान्य असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

# यंदा लाल तिखटाचा भडका उडणार; मिरचीची आवक घटल्याने दर वाढणार

● नंदुरबार, सचिन कदम :



आगार समजल्या जाणाऱ्या नंदुरबार जिल्ह्यात यंदा मिरचीचे उत्पादन घटल्याने बाजार समितीत गेल्या वर्षीच्या तुलनेत ७० टक्यांनी आवक कमी झाली आहे. परिणामी, यंदा लाल तिखटाचे भाव वाढण्याची शक्यता आहे.

देशात आंध्र प्रदेशातील गुंटूरनंतर मिरची उत्पादनात नंदुरबार जिल्हा हा प्रसिध्द आहे. नंदुरबार कृषी उत्पन्न बाजार समितीत दरवर्षी मोठ्या प्रमाणात ओल्या लाल मिरचीची आवक होते. ही मिरची पथारीवर सुकवून प्रक्रिया केल्यानंतर तिची लाल भुकटी बाजारात विक्रीसाठी आणली जाते. शेतकऱ्यांसाठी नगदी पीक मानल्या जाणाऱ्या मिरचीला यंदा जास्तीच्या पावसाचा फटका बसला. त्यामुळे मिरची उत्पादकांचे नुकसान झाले. यंदा सरासरीपेक्षा २५ टक्के जास्तीचा पाऊस झाल्याने मिरची पिकावर मर आणि मूळ कुजवा रोगाचा प्रादूर्भाव झाला. त्यामुळे १५ ते २० टक्के शेतकऱ्यांनी मिरचीची रोपे उखडून टाकली. शिल्लक पिकावरही रोग पडल्याने फुलोरा येऊ शकला नाही. परिणामी मिरची उत्पादनात घट झाली आहे.

नंदुरबार कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून मिरचीची आवक सुरु झाली. जवळपास तीन महिन्यात आतापर्यंत ४५ ते ५० हजार क्विंटल आवक झाली आहे. प्रारंभी ओल्या लाल मिरचीला २५०० ते चार हजार रुपये असा भाव मिळाला. सध्या तीन हजार ते ५१०० रुपये असा भाव मिळत आहे. कोरड्या लाल मिरचीला सहा हजार ते १२ हजार रुपये भाव आहे. जेमतेम दीड महिन्याचा हंगाम बाकी असून उर्वरित दिवसात ५० हजार क्विंटल आवक होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. म्हणजेच यंदा एक लाख क्विंटल मिरची बाजार समितीत येण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी तीन लाख क्विंटलहून अधिक आवक झाली होती. आवक घटल्याचा परिणाम लाल तिखटाचे भाव वाढण्यात होणार आहे.

# अंतिम देय मुदतीपूर्वी मालमत्ता कर भरण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून आवाहन

● मुंबई, यश सावंत :

सोमवार दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजेपासून तर रात्री १० वाजेपर्यंत आणि मंगळवार ३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजेपासून मध्यरात्री १२ वाजेपर्यंत कर भरण्यासाठी नागरी सुविधा केंद्र राहणार सुरु. विद्यमान आर्थिक वर्षाचे मालमत्ता कर संकलन उद्दिष्ट्य ६ हजार २०० कोटी रुपये; आतापर्यंत ३ हजार ५८२ कोटी ६७ लाख रुपये (५८ टक्के) कर संकलन सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मुख्यालय, सर्व प्रशासकीय विभाग (वॉर्ड) कार्यालयांमधील नागरी सुविधा केंद्रे कर भरण्यासाठी रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवण्यात येणार आहेत. दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजेपासून तर रात्री १० वाजेपर्यंत आणि मंगळवार दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजेपासून मध्यरात्री १२ वाजेपर्यंत कर भरण्यासाठी नागरी सुविधा केंद्रे सुरु राहणार आहेत. कर भरण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी करभरणा न केल्यास संबंधितांवर कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल. त्यामुळे नागरिकांनी मुदतीपूर्वी त्यांच्या मालमत्ता कराचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांना दिलेल्या मुदतीत करभरणा करता यावा, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागाच्या वतीने वेळोवेळी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

मालमत्ताधारकांच्या सोयीसाठी शनिवारी देखील प्रशासकीय विभाग (वॉर्ड) कार्यालय तसेच नागरी सुविधा केंद्र सुरू ठेवण्यात आले आहेत. तसेच यासंबंधीत अडचणींचा निपटारा करण्यासाठी कर निर्धारण व संकलन विभागाचे अधिकारी, कर्मचारी अविरत कार्यरत आहेत.

# अटलबिहारी वाजपेयींनंतर दीक्षाभूमीला भेट देणारे डॉ. मनमोहन सिंग दुसरे पंतप्रधान होते

● नागपूर, नितीन देवळेकर :



देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनावर देशभरातून शोक व्यक्त होत आहे. केंद्र सरकारने ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. देशभरात राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आला. राजकीय वर्तुळाबरोबरच सामाजिक आणि इतरही क्षेत्रांमधून मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर देशाने एक अभ्यासू अर्थतज्ज्ञ आणि मितभाषी व्यक्तीमत्व गमावल्याच्या भावना व्यक्त होत आहेत. देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी सिंग यांच्या निधनावर समाज माध्ममावर पोस्ट केली होती. आज त्यांनी मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली देणारा व्हिडीओ संदेश जारी केला आहे. १ जुलै २००६ रोजी नागपूरमध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी विदर्भात येऊन नागपूरमध्ये विदर्भातील सर्वाधिक दुष्काळग्रस्त, शेतकरी आतम्हत्याग्रसत अशा सहा जिल्ह्यांसाठी शेतकऱ्यांना त्यांच्या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी ३७५० कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. यावेळी त्यांनी दीक्षाभूमिला भेट दिली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतलेल्या दीक्षाभूमीवर आतापर्यंत केवळ तीनच पंतप्रधानांनी हजेरी लावली. . एनडीएच्या शासनाच्या काळात अटलबिहारी वाजपेयी हे पहिले पंतप्रधान होते. तर यूपीए सरकारच्या काळात पंतप्रधान असलेले डॉ. मनमोहन सिंग हे दीक्षाभूमीला भेट देणारे दुसरे पंतप्रधान होते.

### अस्थिकलशाचे दर्शन घेतले

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीचे सदस्य सुधीर फुलझेले यांनी त्यावेळच्या आठवणी सांगितल्या. डॉ. मनमोहन सिंग यांच्या ताफ्याचे दीक्षाभूमी परिसरात आगमन झाल्यानंतर मुख्य प्रवेशद्वारापासूनच काही अंतरावर गाडी सोडून ते आमच्यापर्यंत आले. समितीचे सर्व सदस्य आणि काँग्रेसचे काही नेते त्यांच्या स्वागतासाठी उभे होतो. समितीचे तत्कालीन सचिव सदानंद फुलझेले यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. मनमोहन सिंग यांनी स्तुपात प्रवेश केला. त्यांनी सर्वप्रथम अस्थिकलशाचे दर्शन घेतले. त्यानंतर गौतम बुद्ध व डॉ. आंबेडकरांना आदरांजली अर्पण केली. तसेच संपूर्ण दीक्षाभूमी परिसराला एक फेरी मारली. यावेळी बाहेर शेकडोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांना त्यांनी अभिवादनही केले. शेवटी समितीच्या सदस्यांसोबत भेट घेत चर्चा केली.

# ७ लाखाचे बक्षीस असलेल्या जहाल माओवाद्याचे गोंदिया पोलिसांपुढे आत्मसमर्पण

● गोंदिया, राकेश गायकवाड :



७ लाखाचे बक्षीस असलेल्या जहाल माओवाद्याने चळवळीतील त्रासाला कंटाळून २६ डिसेबंर रोजी जिल्हाधिकारी प्रजित नायर व पोलीस अधीक्षक गोरख भामरे,अप्पर पोलीस अधीक्षक नित्यांनंद झा यांच्यासमोर आत्मसमर्पण केले.देवा उर्फ अर्जुन उर्फ राकेश सुमडो मुडाम, वय (२७)रा. गुंडम सुटबाईपारा, पोस्ट-बासागुडा, तहसील- ऊसुर, पो. स्टे. पामेड, जिल्हा- बिजापुर (छ.ग.) (सदस्य तांडा दलम, मलाजखंड दलम, पामेड प्लाटून-९चा समिती सदस्य ) असे आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्याचे नाव आहे.

देशातील माओवादी चळवळीला प्रतिबंध व्हावा व अधिकाधिक माओवाद्यांनी आत्मसमर्पण करुन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता तसेच त्यांचे सामाजिक व आर्थिक पुनर्वसन व्हावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनामार्फत नक्षल आत्मसमर्पण योजना राबविली जात आहे.गोंदिया जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक, नित्यानंद झा यांचे मार्गदर्शनाखाली माओवादी चळवळीचे समूळ उच्चाटन करण्याकरिता गोंदिया जिल्हयात प्रभावी नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येत असून विविध उपक्रम राबवून शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती नागरीकांना देवून जनजागृती करण्यात येत आहे.

आत्मसमर्पित माओवादी देवा ऊर्फ अर्जून ऊर्फ राकेश याचे मुळ गाव- बिजापूर जिल्हयातील अतिनक्षल प्रभावित भागात असल्याने त्याचे गावात पूर्वीपासूनच सशस्त्र गणवेशधारी माओवाद्यांचे येणे जाणे होते. माओवाद्यांच्या भुलथापा व प्रलोभनांना बळी पडुन त्यांच्या निर्देशाप्रमाणे लहानपणापासुनच तो नक्षल चळवळीत सहभागी होवून बाल संघटनमध्ये काम करीत होता. सन- २०१४ मध्ये तो पामेड दलम (दक्षीण बस्तर), जि. बिजापुर मध्ये भरती झाला व शस्त्र हातात घेतले.पामेड दलम मध्ये ६ महिने काम केल्यानंतर सन- २०१४ चे अखेरीस त्याने अबुझमाड परिसरात अडीच महिन्याचे प्रशिक्षण घेतले, ते पूर्ण केल्यानंतर त्यास सन २०१५ मध्ये माओवाद्यांचे बस्तर भागातून महाराष्ट्र-मध्यप्रदेश -छत्तीसगड झोनमध्ये पाठवले. सुरुवातीला त्याने दलम सदस्य म्हणून सन २०१५ ते १६ पर्यंत तांडा दलम व सन २०१६ ते १७ पर्यंत मलाजखंड दलम मध्ये काम केले.

त्यादरम्यान मलाजखंड चा चंदु ऊर्फ देवचंद याचा अंगरक्षक म्हणून काम केले. सन- २०१८ मध्ये त्यास परत दक्षीण बस्तर भागात पाठवण्यात आले. २०१८ ते सप्टेंबर २०१९ पर्यंत (माओवादी संघटना सोडण्यापर्यंत) त्याने पामेड प्लाटून क्रं. ९ मध्ये प्लाटून दलम सदस्य म्हणून काम केले.आत्मसमर्पीत माओवादी देवा हा सन २०१४ते २०१९ नक्षल संघटनेत कार्यरत असतांना टिपागड चकमक (जिल्हा गडचिरोली), झिलमिली काशीबहरा बकरकट्टा गोळीबार (जि. राजनांदगाव, छ.ग.), झिलमिली / मलैदा फॉरेस्ट कर्मचारी यांना मारहाण व चौकी जाळपोळ (जि. राजनांदगाव, छ.ग.), हत्तीगुडा / घोडापाठ गोळीबार (जि. राजनांदगाव, छ.ग.), किस्टाराम स्फोट (जि. सुकमा, छ.ग.), पामेड गोळीबार (जि. बिजापुर, छ.ग.) इत्यादी गुन्हयात सहभागी असल्याची माहिती पोलिसांना दिली.

# नवी मुंबईला अमली पदार्थांचा विळखा

● नवी मुंबई, भावना जैन :

नवी मुंबई शहरामध्ये अमली पदार्थांसदर्भातील गुन्ह्यांमध्ये वाढ होत असून जिल्ह्यातील नवी मुंबई या शहराला अमली पदार्थांचा विळखा बसला आहे. या वर्षभरात अमली पदार्थांची ६५४ प्रकरणे समोर आली आहेत. २०२३ मध्ये अमली पदार्थांच्या गुन्ह्याचे प्रमाण ४७५ इतके होते. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत अमली पदार्थांच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याचे स्पष्ट होते. यावर्षी अमली पदार्थ संबंधातील गुन्ह्यांमध्ये ५८ विदेशी नागरिकांना अटक झाली. यातील बहुतांश आफ्रिकेतील आहेत.

रेव्ह पार्ट्या किंवा इतर तस्करीच्या माध्यमातून अमली पदार्थ तरुण-तरुणींपर्यंत पोहचविले जातात. त्यामुळे या अमली पदार्थांच्या विळख्यात सर्वसामान्य घरामधील तरुण-तरुणी बळी पडत आहेत. नवी मुंबई शहरामध्ये यावर्षी अमली पदार्थ संदर्भात ६५४ नोंद झाल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थांपैकी कोकेन हे सर्वाधिक किंमतीचे आहे. यावर्षी १६ कोटी ७० लाख रुपयांचे कोकेन जप्त करण्यात आले असून, २०२३ मध्ये एक कोटी २५ लाख रुपयांचे कोकेन जप्त केले होते.